रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३२९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, सोमवार, दि. ६ मे २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹






# निवडणुकीच्या रणांगणासाठी मतदान यंत्रणा सज्ज

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**लोकसभा मतदारसंघातील मतदान येत्या ७ मे रोजी होत आहे. निवडणूक मतदानासाठी यंत्रणा सज्ज असून, प्रशासनाच्यावतीने मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, दिव्यांगासाठी रॅम्प, उन्हाळ्याची स्थिती लक्षात घेता औषधे, पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या मतदान केंद्रावर बैठकव्यवस्था, उन्हाळा लक्षात घेता मंडप उभारणी आदी सुविधेसोबतच आदी तांत्रिक बाबींची पूर्तताही करण्यात आली आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निःपक्ष, निकोप आणि भयमुक्त वातावरणात पार होईल, मतदारांनी निर्भय होऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले.**



जिल्हाधिकारी किशन जावळे

अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवडणूक मतदान पूर्वतयारीबाबत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जावळे बोलत होते. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे आदी उपस्थित होते.

मतदार माहिती चिठ्ठीचे ९८ टक्के वितरण झाले आहे असे सांगून मतदानासाठी 'छायाचित्रासह मतदार ओळखपत्रासह' पर्यायी १२ पैकी कोणतेही एक ओळखपत्र दाखवून मतदान करता येईल. तसेच, लोकसभा मतदारसंघ क्षेत्राचा विस्तार लक्षात घेता नागरिकांनी मतदानापूर्वी आपल्या मतदान केंद्राची माहिती घ्यावी, असे सांगितले.

जिल्हा प्रशासनाने मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे, यादृष्टीने मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी मतदार सहाय्यता केंद्र स्थापित केले आहेत. मतदारांना वितरीत करण्यात येणाऱ्या मतदार माहिती चिठ्ठीद्वारेदेखील कुठे मतदान करावयाचे आहे ते कळू शकेल.

जिल्हा पलिस अधिक्षक घार्गे यांनी १५ लाख रुपये किमतीची अवैध दारु जप्त करून ३६५ गुन्हे दाखल, १४६२ परवाना शस्त्रे जमा तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे, असे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

### मतदान केंद्र सुरक्षेसह सज्ज

संवेदनशील मतदान केंद्रांमध्ये तीन सीआरपीएफच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. मतदारसंघामध्ये ईव्हीएम बॅलेट युनिट २,१८५, कंट्रोल युनिट २,१८५ व व्हीव्हीपॅट २,१८५ मशीन्सचे कमिशनिंग करण्यात आले आहे. सर्व २,१८५ मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, दिव्यांगासाठी रॅम्प, उन्हाळ्याची स्थिती लक्षात घेता औषधे, पाच पेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या मतदान केंद्रावर बैठकव्यवस्था, १९४९ ठिकाणी पाळणाघर, उन्हाळा लक्षात घेता सावली साठी ५५० मतदान केंद्राच्या ठिकाणी मंडप, आणि मतदारांच्या मदतीसाठी १८ वर्षाखालील २,९२१ स्वयंसेवक नियुक्त करण्यात आले आहेत.

### मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मतदान

मतदारसंघात १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार असून ८ लाख ४७ हजार ७६३ महिला तर ८ लाख २० हजार ६०५ पुरुष आणि ४ तृतीयपंथीय मतदार आहेत. मतदानाची सर्वसाधारण वेळ सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आहे. मात्र, मतदान केंद्रावर सायंकाळी ६ वाजेपर्यंत जेवढे मतदार उपस्थित असतील त्या सर्वांची मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हे मतदान केंद्र सुरु राहील. मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात आली असून वोटर गाईड देण्यात आले आहे. मतदारांना मतदार वोटर स्लिप उपलब्ध करून दिल्या असून इपीआयसी व्यतिरिक्त कोणते दस्तऐवज मतदानासाठी वापरता येतील याबाबत वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देवून जनजागृती करण्यात आली आहे.

### मतदान केंद्रस्तरीय मनुष्यबळाचे व्यवस्थापन

या निवडणुकीसाठी लागणारे साहित्य, साधनसामग्री २१८५ मतदान केंद्रांवर पुरवण्यात आलेली आहे. निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी ८७४० मतदान केंद्रस्तरीय मनुष्यबळ असून, राखीव अधिकारी कर्मचारी यांच्यासह पुरेसे ९,७७१ प्रशिक्षित मतदार कर्मचारी व अधिकारीवर्ग उपलब्ध आहेत. यामध्ये ३५१७ महिला, ४७ दिव्यांग अधिकारी कर्मचारी आहेत. तसेच, १८७ पोलीस अधिकारी, २०६० पोलिस, १३६३ होमगार्ड, सीआरपीएफ २४३ आणि शिघ्र कृती दलाच्या २३ प्लाटून तैनात ठेवण्यात आल्या आहेत. मनुष्यबळाचे रॅण्डमायझेशन करुन त्यांच्या सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. मतदार केंद्रावर जाण्यासाठी ११६ जीप व २१६ बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

### आचारसंहिता भंगाबाबतच्या तक्रारी

१६ मार्च ते ३ मे या कालावधीत जिल्ह्यात सी व्हिजील ॲपवर आचारसंहिता भंगाबाबतच्या ५७ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यातील ५७ तक्रारी उचित कार्यवाही करुन निकाली काढण्यात आलेल्या आहेत. तसेच, याकालावधीत एनजीएसपी पोर्टलवरील १५६८ प्राप्त तक्रारीपैकी १५४० निकाली काढण्यात आल्या आहेत. तसेच, आचारसंहिताबाबत पाच लेखी तक्रारी प्राप्त असुन सर्व तक्रारी नियमानुसार कारवाही करून निकाली काढलेल्या आहे. तसेच, दूरध्वनी क्र. १९५० वर २०४ तक्रारी प्राप्त झालेल्या असून २०४ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

---

# सोशल मीडियावर रायगड पोलिसांची करडी नजर

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अमंलबजावणी सुरु आहे. सायबर सेल आणि मीडिया सेलच्या माध्यमातून करडी नजर ठेवण्यात येत आहे. सोशल मीडिया (व्हॉट्सॲप) वर लोकसभा २०२४ च्या अनुषंगाने आक्षेपार्ह व दोन समाजात तेढ निर्माण करणारी ऑडिओ क्लिप व्हायरल करणाऱ्या अज्ञात इसमावर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगड जिल्हा पोलीस दलाकडून सोशल मीडिया मॉनेटरिंग करण्याकरिता सोशल मीडिया सेल स्थापन करण्यात आलेला असून, त्याद्वारे फेसबुक, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम व ट्विटर या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्या नेत्यांनी केलली भाषणे व त्या अनुषंगाने लोकांनी केलेली टीका टिप्पणी तसेच व्हॉट्सॲप ग्रुपवर लोकांनी व्हिडीओ, ऑडिओ व इतर प्रकारे केलेल्या पोस्ट यांची तपासणी केली जात आहे. आक्षेपार्ह पोस्ट मिळून आल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुसार सोशल मीडिया लॅबद्वारे मॉनिटरिंग करण्यात येत आहे. ४ मे रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सोशल मीडिया मॉनेटरिंग करीत असताना गोपनिय सूत्रांकडून एक ऑडिओ क्लीप आढळून आली. या क्लीपमध्ये दोन समाजात तेढ निर्माण होईल, असे वक्तव्य असल्याचे आढळून आले. या ऑडिओ क्लीपमधील आवाज विशिष्ट समाजाला भडकावून सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आणणारे आहे. या अज्ञात इसमाविरूद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याकडून सुरू करण्यात आला आहे.

सोशल मीडियावर समाजात तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही आक्षेपार्ह पोस्ट करू नये, असे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला आहे.

# निवडणुक कर्मचाऱ्यांची चोख व्यवस्था

**। म्हसळा । वार्ताहर ।**



मंगळवारी (दि.७) संपन्न होणाऱ्या रायगड लोकसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या तालुक्यातून येणाऱ्या आणि म्हसळा तालुक्यातून इतर तालुक्यात जाणाऱ्या निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे चोख व्यवस्था ठेवण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार समीर घारे, तहसीलदार महेंद्र वाकलेकर, निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे, निवडणूक नायब तहसीलदार संध्या अंबुर्ले यांनी चांगल्या प्रकारे नियोजन केले आहे, अशी माहिती तहसीलदार समीर घारे यांनी कृषीवलला दिली.

कुठल्याही निवडणूक अधिकारी, कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची गांभीर्याने दखल घेतली जाणार आहे. दिव्यांगासाठी व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, मेडिकल किट, ओआरएस, सेल्फी पॉईंट, गाडी पार्किंग, भोजन व्यवस्था, सीसीटीव्ही व्यवस्था, आसन व्यवस्था इत्यादी सोयीसुविधा देण्यात येणार असल्याचेही घारे यांनी सांगितले. या कामासाठी मंडळ अधिकारी सलीम शहा, तलाठी मयूर ठाकरे, अजय जाधव, शैला गवळी, शेखर सोनवणे, प्रकाश उघडे, हेमंत मोरे, आशिष पवार, सर्व कोतवाल, महसूल कर्मचाऱ्यांनी सहकार्य केल्याचेही घारे यांनी सांगितले.

# मजगावमध्ये मविआचा जोरदार प्रचार



**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी जनसंपर्क अभियान मजगाव येथे राबवण्यात आले. यावेळी घरा घरात भेट देउन उमेदवाराचे चिन्ह नीट समजावून सांगून मतदान करण्याची विनंती करण्यात आली. यावेळी शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस आय, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित लोकांनी मतदारांना अनंत गीते यांच्यावर कोणताही भ्रष्ठचाराचा आरोप नाही. तसेच, उत्तम वक्तृत्त्व व संसदेचे उत्तम काम करणारे प्रदीघ अनुभव असणारे अनंत गीते असून बहुमूल्य मत त्यांनाच देण्याची विनंती करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मजगाव येथील विविध भागांत जोरदार प्रचार केला.

या जनसंपर्क अभियानात माजी सभापती चंद्रकांत कमाने, मजगाव उपसरपंच प्रीतम पाटील, इम्तियाज मलबारी, माजी सरपंच संतोष जमनु, नरेश बुल्लू, शबाब उलडे, इस्माईल झोंबरकर, येजू सुभेदार, किशोर कार्लेकर, ॲड. इस्माईल घोले, माजी उपसरपंच अस्लम हलडे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## वे|ध|क

### सांगवीमध्ये धडाडणार आघाडीच्या तोफा

**पनवेल :** तुम्ही एखाद्याची मालमत्ता चोरू शकता पण त्याचे मालमत्ता कमावण्याचे हुनर तुम्हाला कदापिही चोरता येत नाही. हे वाक्य महायुतीमधील महाचोरांना चपखल बसते. असाच घणाघात चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर ऐकायला मिळणार आहे. मावळ लोकसभा मतदारसंघाचे मविआचे लोकप्रिय अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि.८) सायंकाळी सहा वाजता महासभा आयोजित करण्यात आली आहे. शिवसेना उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, काँग्रेस, समाजवादी पार्टी, शेकाप, आम आदमी पार्टी, सीपीआय, आरपीआय (ए), स्वाभिमानी रिपब्लिकन युथ पार्टी, स्वराज इंडिया असे महाविकास आघाडी मधील घटक पक्षांचे नेते या महासभेमध्ये आपले विचार मांडणार आहेत.

### ग्रामीण भागात तटकरेंकडे पाठ : म्हात्रे

**पेण :** पेण तालुक्यात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी प्रचारात जोरदार मुसंडी मारली असून, प्रत्येक घरापर्यंत मविआचे कार्यकर्ते पोहोचले आहेत.



आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी प्रचारादरम्यान बोलताना शिवसेनेचे युवा नेते समीर म्हात्रे यांनी सांगितले की, जसजशी मतदानाची तारीख जवळ येत आहे, तसतसा गीतेसाहेबांना जनसामान्यांचा पाठिंबा वाढत आहे. अक्षरशः ग्रामीण भागातील जनतेने तटकरेंकडे पाठ फिरवली आहे, असेही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, गेल्या पाच वर्षात स्वतः खासदार, त्यांची कन्या रायगडच्या तत्कालीन पालकमंत्री आणि आताच्या सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री, त्यांचे चिरंजीव आमदार असे तीन-तीन संविधानात्मक पद असताना पेण तालुक्याच्या विकासाकडे त्यांनी कानाडोळा केला.

# आघाडीची वज्रमूठ प्रस्थापितांना दणका देण्यासाठी सज्ज

**। पनवेल । वार्ताहर ।**

## शेकापचे रवींद्र भगत यांचा घणाघात



कळंबोली वसाहत ही सुरुवातीपासून शेकापचा बालेकिल्ला राहिलेली आहे. महानगरपालिकेमध्ये ही वसाहत अंतर्भूत होण्यापूर्वी या ठिकाणी ग्रामपंचायत होती. या ग्रामपंचायतीवर लालबावटा डौलाने फडकत होता. अशातच काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट व मित्रपक्ष आमच्यासोबत असल्याने महाविकास आघाडीची वज्रमूठ प्रस्थापितांना दणका देण्यासाठी सज्ज झाली आहे. विद्यमान खासदारांनी कळंबोली वसाहतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा घणघात शेकापचे पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक रवींद्र भगत यांनी केला. कळंबोली विभागात आमचे असलेले प्राबल्य पाहता सत्ताधाऱ्यांनी कळंबोलीमध्ये ढुंकूनदेखील पाहिलेले नाही, असा आरोपही भगत यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, मावळ मतदारसंघामध्ये विद्यमान खासदारांच्या विरोधात असलेले वातावरण चांगलेच तापले आहे. नुकताच पनवेल कळंबोलीमधील गुरुद्वाराचे प्रधान यांनी संजोग वाघेरे पाटील यांना पाठिंबा देणार असल्याचे जाहीर केले. त्यानंतर सकल मराठा समाजाने महायुतीने फसवल्यामुळे मनातील खदखद व्यक्त करत महाविकास आघाडीच्या पाठीमागे ठामपणे उभे राहण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे विद्यमान खासदारांची धडधड नक्कीच वाढलेली असणार.

कळंबोली वसाहत ही सुरुवातीपासून शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला राहिलेली आहे. काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट व मित्रपक्ष आमच्यासोबत असल्याने महाविकास आघाडीचा दणका प्रस्थापितांना देण्यासाठी सज्ज झाली आहे. विद्यमान खासदारांनी कळंबोली वसाहतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग जेथून सुरू होतो ती ही कळंबोली वसाहत. आशिया खंडातील सगळ्यात मोठे लोखंड व पोलाद बाजार आवार या वसाहतीमध्ये आहे. या ठिकाणी असणारे स्टील मार्केट व अन्य गोदामे यामध्ये काम करणारा फार मोठा कामगारवर्ग कळंबोली वसाहतीमध्ये राहतो. मूळ कळंबोली गाव, कष्टकरी व मध्यम उत्पन्न गटातील नागरिक, आणि उच्चभ्रू नागरिक असे संमिश्र जनजीवन याठिकाणी गुण्या गोविंदाने राहात असले तरी त्यांच्यादेखील अनेक प्रलंबित समस्या आहेत. सत्तेमध्ये असो अगर नसो आम्ही नेहमीच त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी खंबीरपणे उभे असतो, असेही भगत म्हणाले.

संजोग वाघेरे पाटील यांच्यासाठी मतांचा जोगवा मागत असताना विद्यमान खासदारांच्या प्रति जनता नाराज असल्याचे प्रकर्षाने जाणवते. आम्ही मात्र सातत्याने जनताभिमुख काम करत असल्यामुळे कळंबोलीवासियांची मते संजोग वाघेरे पाटील यांनाच मिळतील, असाही ठाम विश्वास भगत यांनी व्यक्त केला.

# 'इंडिया'ची प्रचारात 'आघाडी'



**। रसायनी । वार्ताहर ।**

इंडिया आघाडीतील नेते हे मराठा, ओबीसी, दलित, मुस्लिम समाजातील प्रश्नांना थेट हात घालत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचारात अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. विरोधकातील काही पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनादेखील जनतेशी निगडीत असणारे मुद्दे पटत असल्याचे दिसून येते. याच कारणांनी आता विरोधकांच्या प्रचारातील हवा निघून गेली नाही ना, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रचाराचा धुरळा उडाल्याने राजकीय रणांगण तापू लागले आहे. इंडिया आघाडीचे शिवसनेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील हे मशाल चिन्हावर निवडणूक लढवत आहेत.

---

# खालापुरात संजोग वाघेरे पाटलांचा बोलबाला

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

## गावभेटी दौऱ्यात मोठा प्रतिसाद; प्रचारात तरुणाई एकवटली

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी शनिवारी सकाळपासून साजगाव जि.प. वॉर्डातून गावभेटी दौऱ्याल सुरूवात केली. यावेळी चौकाचौकात महिलांनी औक्षण करीत वाघेरेंना पाठिंबा असल्याचे सांगितले. खोपोली परिसरात प्रचार दौऱ्यात 'संजोग वाघेरे तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. वाघेरे यांनी गावा-गावांमध्ये ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, ज्येष्ठ नागरिक यांच्या भेटी घेत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला साथ देण्यासाठी मशाल चिन्ह निवडा, असे आवाहन उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी यावेळी केले.

संजोग वाघेरे यांनी सारसन फाट्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून गावभेटी दौऱ्याला प्रारंभ केला. त्यानंतर साजगाव येथे शेकापचे नेते रामभाई तावडे, माजी उपसरपंच नितीन देशमुख यांनी, ढेकू, होनाड, आत्करगाव येथे शेकापक्षाचे संतोष पाटील यांच्यासह महिलांनी, ठाणेन्हावे, उंबरे, चावणी, शेमडी, दूरशेत, खानाव, चिलठण, देवन्हावे येथे उपसरपंच मनोज पाटील, बंटी नलावडे, भूषण कडव, प्रसाद तावडे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी तर, खरीवली, नारंगी, आपटी, नंदनपाडा, होराळे जांभिवली, गोरठण, वावोशी, शिरवली येथे सरपंच महेश पाटील यांच्या ग्रामस्थांनी जोरदार स्वागत करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

गावभेटी दौऱ्यात सेनेचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस किशोर पाटील, सेनेचे तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, शेकापक्षाचे संतोष जंगम, शहर चिटणीस अविनाश तावडे, रवींद्र रोकडे, कैलास गायकवाड, संतोष पाटील, शांताराम पाटील, सेनेचे युवा सेनेचे महेश पाटील, अनिता पाटील, सुविधा विचारे यांच्यासह महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आघाडीच्या प्रचारकांचे जागोजागी स्वागत

**। रसायनी । वार्ताहर ।**



मावळ लोकसभा मतदारसंघात दिवसागणिक महाविकास आघाडीचे अधिकृत व लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, सीपीआय (एम), आरपीआय (ए), स्वाभिमानी रिपब्लिकन युथ पार्टी, स्वराज इंडिया असे महाविकास आघाडीमधील घटक पक्षांचे नेते खालापूर, पनवेल, उरण आणि कर्जत मतदारसंघ पिंजून काढत आहेत. प्रत्येक ठिकाणी महाविकास आघाडीच्या प्रचारकांचे जागोजागी उत्स्फूर्त स्वागत होत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

वासांबे, चौक, वडगाव, गुळसुंदे आदी विभागात महाविकास आघाडीची तगडी फौज शहरी भागापासून ते अगदी मायक्रो इंटिरियरमध्ये जात संजोग वाघेरे पाटील यांची निशाणी असणारी मशाल घरोघरी पोहोचवत आहेत.

# 'विकासकामांच्या जोरावर गीतेंचा विजय निश्चित'



**। शिहू । वार्ताहर ।**

विकासकामांच्या जोरावर अनंत गीतेंचा विजय निश्चित आहे, असा विश्वास महाविकास आघाडीचे शेकाप नेते तथा कुर्डुसचे माजी सरपंच संदीप पाटील यांनी व्यक्त केला. अनंत गीते हे विक्रमी मतांनी विजयी होण्यासाठी अलिबाग तालुक्यातील कुर्डुस, सांबरी, अवेटी, नामदेवनगर, कोंझरवाडी, कामथवाडी, चिंभ्रण ठाकूरवाडी, दुर्गदर्या, बीडवागले येथे संदीप पाटील व सर्व कार्यकर्ते गावागावात जाऊन मतदारांसोबत संपर्क करून प्रचारात आघाडी घेत आहेत.

आदिवासी वाड्यांवर आपण केलेल्या विकासकामांची पोचपावती नक्की मतदार देतील व अनंत गीते निश्चितच विक्रमी मतांनी निवडून येतील, असा दृढ विश्वास संदीप पाटील यांनी केला आहे.

या प्रचार दौऱ्यात त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सारिका पाटील, माजी सरपंच रामचंद्र कर्वे, संतोष पाटील, सुनील म्हात्रे, कलेंद्र पाटील, राजेश पाटील, शेखर शेळके, तुकाराम पाटील, कुमार गदमले, चंद्रकांत पाटील, जयेश पाटील, चंद्रकांत नाईक, संदीप नाईक, धनाजी नाईक, कुमार शेळके, धर्मदास पाटील, मुरलीधर पाटील, अशोक पाटील, लीलावती पाटील, वैजयंता पाटील, सुनीता म्हात्रे आदी कार्यकर्त्यांची मोलाची साथ लाभत आहे.

# आघाडीच्या प्रचाराचा झंझावात

**। शिहू । वार्ताहर ।**



इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार अनंत गीते यांना निवडून आणण्यासाठी शिहू विभागातील चोळे, गांधे, आंबेराई, झोतिरपाडा, बेणसे, टाऊनशिप, बेणसेवाडी, कुहीरे आदी भागात शिवसेना शिहू विभाग सहसंपर्क प्रमुख अशोकभाई भोय यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराचा झंझावात वाढला आहे. तसेच, सर्व कार्यकर्ते विभाग पिंजून काढत आहेत. मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचार करत आहेत. 'कहो दिलसे अनंत गीते फिरसे' असा नारा देत अनंत गीते यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे मतदारांना आवाहन करण्यात येत आहे. अनंत गीते यांनी केलेल्या लोकोपयोगी कामांमुळे त्यांचा विजय निश्चित होणार असून, औपचारिक शिक्कामोर्तब होणे बाकी असल्याचे ठाम मत शिवसेना शिहू विभाग सहसंपर्क प्रमुख अशोक भोय यांनी व्यक्त केला आहे.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ३२९ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ६ मे २०२४

किंमत ४ ₹




(छायाचित्र : समीर मालोरे)

# हाती मशाल, विजय विशाल

**। रायगड/अलिबाग । प्रतिनिधी ।**
**हुकूमशाहा मोदींविरोधात देशातील जनतेमध्ये तीव्र संतापाची लाट आहे. त्यांच्याविरोधात लोकशाहीचा बॉम्ब फुटणार असल्याने इंडिया आघाडीची सत्ता येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे, असे प्रतिपादन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. अलिबाग येथील समुद्रकिनारी असणाऱ्या जेएसएमच्या मैदानावर इंडिया आघाडीची सभा रविवारी (दि. ५) पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. आपली निशाणी मशाल असून, या मशालीने आता अन्याय आणि गद्दारीला जाळून टाका, आणि अनंत गीते यांचा विजय विशाल करा, असे आवाहन त्यांनी रायगडच्या मतदारांना केले.**

## ओरबाडलेलं महाराष्ट्राचं वैभव परत मिळविणार

## देशाचे संविधान, लोकशाहीचा बचाव करणार

## हुकूमशाहीविरोधात लोकशाहीचा बॉम्ब लवकरच फुटणार

## आमचे हिंदुत्व सर्व जाती-धर्मांना सोबत नेणारं



दरम्यान, रायगड लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे अनंत गीते यांना प्रचंड मताधिक्क्यानी निवडून आणा, असे आवाहन त्यांनी रायगडच्या मतदारांना केले. तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराला रविवारी पूर्ण विराम मिळाला.

देशातील मोदी सरकारची वाटचाल हुकूमशाहीकडे सुरु आहे. त्यांना वेळीच रोखणे गरजेचे आहे. एकाच पक्षाचे सरकार आले तर काय होते, हे देशातील जनतेने गेल्या दहा वर्षांत भोगले आहे. देशाला स्थिर देण्याची धमक फक्त इंडिया आघाडीतील घटक पक्षांमध्येच असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. रायगडकरांनी निसर्ग आणि तोक्ते चक्रीवादळाचा सामना केला आहे. त्यामुळे मला विश्वास आहे की, तटकरेंसारख्या फडफडणाऱ्या वक्रीवादळाचा सामना तुम्ही सहज करु शकता. या निवडणुकीतून त्यांना कायमचे हद्दपार करा, असे आवाहन ठाकरे यांनी केले.

देशातील राजकारणाची आयपीएलसारखी अवस्था झाली आहे. त्यामध्ये खेळाडूंचा लिलाव करुन खरेदी केली जाते. त्याचप्रमाणे आता राजकारणातील वक्तींची बोली लावून त्यांना लिलावात विकत घेतले जात आहे, असा घणाघात ठाकरे यांनी केला.

शिवाजी महाराजांनी या रायगडच्या मातीचे ऋण ओळखले असेल म्हणूनच त्यांनी आपल्या स्वराज्याच्या राजधानीसाठी रायगडची निवड केली. शूर आम्ही वंदितो, असे बोलले जाते. मात्र, भाजपामध्ये चोर आम्ही वंदितो, असा प्रकार सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. रायगडाला आता जाग आली आहे. त्यामुळे तटकरेंचा पराभव निश्चित असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

मोदी सरकारने आतापर्यंत देशातील जनतेची महागाई, बेरोजगारी, शेतीमालाला हमीभाव अशा विविध प्रश्नी फसवणूक केली आहे. मोदींची गॅरंटीही खोटी आहे. इंडिया आघाडीच्या पाठीशी आमची माय-बाप जनता आहे. त्यामुळे आमच्याकडे जनतेची गॅरंटी असल्याने आम्हाला अन्य कोणाची गॅरंटी नको, असेही ठाकरे यांनी स्पष्ट केले.

आम्ही कधीच हिंदूत्व सोडले नाही. आमचे हिंदूत्व हे सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन जाणारे आहे. भाजपा हे जाती-धर्मामध्ये विष कालवत असून, त्यांचे हिंदुत्व हे बेगडी आहे. त्यांनी हिंदुत्वाच्या नावावर देशात नंगानाच चालवला आहे, असे टीकास्त्र ठाकरे यांनी सोडले.

देशात दोन टप्प्यात पार पडलेल्या मतदानानंतर भाजपाला निवडणूक जड जात आहे, असे चित्र दिसत आहे. त्यामुळे त्यांच्या चारशे पारचा नारा आता मागे पडला आहे. त्यांनी महागाई, बेरोजगारी, १५ लाख रुपये देणार होते. त्यावर बोलावे; परंतु ते यावर बोलणार नाहीत. आधीची भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत माझ्या मनात आत्मीयता आहे, मात्र मोदी-शहांकडे पाहून तसे वाटत नाही, असा टोला त्यांनी लगावला.

•> पान ५ वर (संबंधित वृत्त पान ८ वर)

### जनताच तटकरेंचा बदला घेईल : आ. जयंत पाटील




**अनंत गीते यांना निवडून देण्यासाठी जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी सभा घेण्यात आल्या. या सभांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. कार्यकर्ते व मतदार स्वयंस्फूर्तीने प्रचार रॅलीमध्ये सहभागी होत आहेत. वेगवेगळ्या समाजातील मतदारांबरोबरच मुस्लीम समाजाचादेखील चांगला पाठिंबा मिळत आहे. ही निवडणूक ऐतिहासिक असणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानाच्या संरक्षणासाठी ही लढाई आहे. मागच्या निवडणुकीत तटकरेंना निवडून दिले. मात्र, त्यांनी आपल्याशीच गद्दारी केली. त्याची चीड कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड आहे. सर्व कार्यकर्ते हा बदला घेण्यासाठी सज्ज आहेत. अनंत गीते यांना प्रत्येक तालुक्यात, केंद्रातून मताधिक्य मिळणार आहेत. त्या पद्धतीने कार्यकर्ते काम करीत आहेत. रायगडमधून तटकरेंना हद्दपार करण्याची प्रतिज्ञा केली आहे, ही प्रतिज्ञा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी जनताच तटकरेंचा बदला घेणार आहे, असा विश्वास शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी व्यक्त केला.**

### मोदी जेलमध्ये जातील : हुसेन दलवाई




**गेल्या काही वर्षांपासून देशात काळोख निर्माण करण्यात आला आहे. मनमानी कारभार करण्याबरोबरच सत्तेचा वापर करीत गुलाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशात पसरत आलेला अंधकार घालविण्यासाठी आणि प्रकाश आणण्यासाठी या निवडणुकीत अनंत गीतेंसह इंडिया आघाडीच्या उमेदवारांना बहुमांनी निवडून द्या. अनंत गीते निवडून आल्यावर ते मंत्री होणार आहेत. कोकणात रेल्वे सेवा सुरु राहिली पाहिजे. गरीबांच्या हाताला काम मिळाले पाहिजे. बेरोजगारांना रोजगार मिळेल या पद्धतीने काम केले जाणार आहे. हा क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हा. इंडिया आघाडी सत्तेवर येणार आहे. इंडिया आघाडीची सत्ता आल्यावर मोदींना पळून देणार नाही, तर त्यांना जेलमध्ये पाठवू, असा इशारा काँग्रेसचे नेते हुसेन दलवाई यांनी दिला.**

### तटकरेंना जनताच हद्दपार करणार : अनंत गीते

**ही निवडणूक जनता विरूद्ध भाजप अशी असणार आहे. राज्यात ३८हून अधिक खासदार इंडिया आघाडीचे येणार आहेत. या निवडणुकीत तटकरेंना राजकारणातून जनताच हद्दपार करणार आहे, असे प्रतिपादन महाविकास आघाडीचे उमेदवार माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी केले. पुढे ते म्हणाले, या निवडणुकीत प्रचारासाठी शेकापचे जयंत पाटील यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी व इतर घटक पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचंड मेहनत घेत आहे. गावागावात जाऊन प्रचार करीत आहेत. देश, संविधान वाचविण्यासाठी मतभेद विसरून इंडिया आघाडीच्या माध्यमातून सर्वजण एकत्र आले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत यश नक्कीच मिळणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

---

## विदेशी प्रतिनिधी मंडळ रायगड दौऱ्यावर; निवडणूक प्रक्रियेची पाहणी करणार

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

भारत निवडणूक आयोगाने अन्य देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्था यांच्याबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सहभागासाठी कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याअंतर्गत विदेशी प्रतिनिधी मंडळ निवडणूक प्रक्रियेची पाहणी करण्याकरिता दि. ६ ते ८ मे या कालावधीत रायगड जिल्ह्याला भेट देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

सदर प्रतिनिधी मंडळामध्ये सात सदस्य असून, ते रायगड लोकसभा मतदारसंघातील विविध ठिकाणी भेट देऊन निवडणूक प्रक्रियेची पाहणी करणार आहेत. महाराष्ट्रातील केवळ रायगड जिल्ह्यामध्ये हे मंडळ भेट देणार आहे. विदेशी प्रतिनिधी मंडळामध्ये बांगलादेशचे दोन प्रतिनिधी महंमद मोनिरुझ्झमन टी, जी.एम. शाहताब उद्दीन (बांगलादेश निवडणूक आयोग अधिकारी), कझाकिस्तान देशाचे दोन प्रतिनिधी नुरलान अब्दिरोव, आयबक झीकन (केंद्रीय निवडणूक आयोग कझाकिस्तान), श्रीलंका देशाच्या सिलजा हिलक्का पासिलीना (संचालक श्रीलंका), झिम्बाबे देशाचे न्यायमूर्ती प्रिशीला चिगूम्बा आणि सिम्बराशे तोंगाई (केंद्रीय निवडणूक आयोग झिम्बोबे) आहेत.



हे विदेशी प्रतिनिधी मंडळ सोमवारी ६ मे रोजी सकाळी ९ वा अलिबाग येथे मतदान प्रक्रियेची पाहणी करणार आहेत. पोलिंग पार्टीचे आगमन व प्रस्थान, साहित्य वाटप याची जेएसएम कॉलेज येथे पाहणी करणार आहेत. त्यानंतर दुपारी ३ वा जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यासमवेत बैठक होणार आहे. ७ मे रोजी विविध मतदान केंद्रांना भेटी देऊन प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेची माहिती घेणार आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीची फसवणूक

### आरोपीवर बलात्काराचा गुन्हा दाखल

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

एका तरुणीशी इंस्टाग्रामवर ओळख होऊन लग्नाचे आमिष दाखवत शारीरिक संबंध प्रस्थापित करून फसवणाऱ्या मुलावर बलात्काराचा गुन्हा मुरुड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

याबतचे सविस्तर वृत्त असे की, सदरची केस ओशिवरा पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. मुलीची फसवणूक करणारा मुलगा हा मुरुड शहरातील दत्तवाडी परिसरातील असल्याने सदरची केस मुरुड पोलिसांकडे वर्ग करण्यात आली आहे. एका उत्तर भारतीय तरुणीची ओळख इंस्टाग्रामवरून



होऊन त्यांचे प्रेम जुळले होते. मुरुड दत्तवाडी येथील आरोपीने लग्नाचे आमिष दाखवत फिर्यादी तरुणीसोबत शारीरिक संबंध ठेवले. तसेच वेगवेगळी कारणे दाखवून पीडित तरुणीकडून ५ लाख ६६ हजार ५४९ रुपये एवढी रक्कम उसनवारी म्हणून स्वीकारली. ही रक्कम परत मागितली असता आरोपीने तरुणीला •> पान ५ वर

## तिसऱ्या टप्प्यातील प्रचार थंडावला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराची रविवारी (दि. ५) सांगता झाली. या टप्प्यात १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ९४ जागांसाठी मंगळवारी ७ मे रोजी मतदान होणार आहे. महाराष्ट्रातील बारामती, रायगड, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या मतदारसंघांचा यात समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यात गुजरातमधील सर्वच्या सर्व २६ जागांसाठी मतदान होणार आहे. याशिवाय कर्नाटकमधील १४, उत्तर प्रदेशातील १०, मध्य प्रदेशातील ८ आणि छत्तीसगडमधील ७ मतदारसंघांत मतदान होणार आहे.

## मतदानासाठी भरपगारी रजा

### किशन जावळे यांचे आदेश

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा मतदारसंघात क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदार करता यावे यासाठी मंगळवार, ७ मे रोजी भरपगारी रजा देण्यात यावी, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.



तिसऱ्या टप्प्यात मंगळवारी ७ मे रोजी मतदान होणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व आस्थापना प्रमुखांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचारी/रोजंदारी कर्मचारी यांना ७ मे रोजी भरपगारी रजा मंजूर करण्याचे आदेश पुढील शर्ती/अटीस अधिन राहून देय आहे. सदर आदेश हा शासकीय आस्थापना/खासगी आस्थापना/रोजंदारीवरील कर्मचारी आस्थापना/दुकाने/कंपनी/अशा सर्व आस्थापनांना लागू आहे. ज्या आस्थापनांमध्ये उक्त कामगारांचे अनुपस्थितीमुळे उक्त आस्थापनांचा धोका निर्माण होऊ शकतो अथवा मोठ्या प्रमाणात तोटा होऊ शकतो अशा कर्मचाऱ्यांसाठी लागू नाही. आदेश हा अन्य जिल्ह्यात काम करणाऱ्या परंतु जिल्ह्याच्या क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांच्या आस्थापना प्रमुखांनाही लागू होत आहे, असेही आदेशात म्हटले आहे.

---

## युवक बनणार दिव्यांग मदतनीस

**१७९५ मतदान केंद्रांवर स्वयंसेवक**
**१८ वर्षांखालील तरुणांवर जबाबदारी**

**। सुयोग आंग्रे ।**
**। रायगड ।**

**आगामी लोकसभा निवडणुकीत दिव्यांग मतदारांना मदतनीस देण्यासाठी निवडणूक प्रशासनाने तयारी केली आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या जिल्ह्यातील संस्थांशी संपर्क साधण्यात आला आहे. मतदानादिवशी या संस्थांची मदत घेण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील १२ हजार ३६३ दिव्यागांची यादी निवडणूक प्रशासनाकडे प्राप्त झाली आहे. यामध्ये सहा हजार ४५१ दिव्यांग मतदार रायगड मतदारसंघात, तर पाच हजार ९१२ मावळ मतदारसंघात मतदान करणार आहेत. मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी स्वयंसेवकांची मदतनीस म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, हे स्वयंसेवक युवक असणार आहेत.**



निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, १८ वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीने मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जिल्हा, तालुका, गाव पातळीवर प्रशासन जनजागृती करीत आहे. याअंतर्गत अपंगत्व हे मतदानात अडथळा ठरू नये यासाठी प्रशासन दिव्यांग मतदारांपर्यंत पोहोचत आहे. यापूर्वीच्या निवडणुकीत उमेदवारांचे कार्यकर्तेच दिव्यांग मतदारांना घरापासून मतदान केंद्रापर्यंत घेऊन येत आणि घरी पोहोचवत. यावर विरोधी उमेदवारांकडून आक्षेप, तक्रारी घेतल्या जातात. त्यामुळे निवडणूक प्रशासन त्यांना मदतनीस मिळवून देणार आहे. मदतनीसांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षणही देण्यात आले आहे. सुधारित अपंग हक्क कायद्याच्या •> पान ५ वर

### अंध मतदारांना ब्रेलपट्टी

**पूर्णपणे अंध मतदारांनाही मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान यंत्रावर ब्रेल लिपीतील पट्टी असणार आहे. मदतनिसाने संबंधित मतदारास त्या पट्टीची ओळख करून द्यायची आहे. नंतर ते स्वत: मतदान करतील. दोन्ही पायांनी अपंग मतदारांना व्हीलचेअरवर बसून मतदान करता येईल, असे मतदान यंत्र बसविण्याची सूचना निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. दृष्टी कमी आणि मानसिक विकारग्रस्त मतदारांना मतदान करताना जादा वेळ देण्यात येणार आहे.**

**लोकसभा निवडणुकीत दिव्यांग मतदारांना मदतनीस देण्यात येईल. त्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार आतापासून जागृती केली जात आहे. दिव्यांगांसाठी काम कारणाऱ्या संस्थांची यासाठी मदत घेण्यात येणार आहे. पूर्णपणे अंध मतदारांनाही मतदान करता यावे यासाठी यंत्रावर ब्रेल लिपीतील पट्टी असेल. कोणत्याही प्रकारच्या दिव्यांगांना मतदान करता येईल याची दक्षता घेत आहोत. मतदान केंद्रांवर दिव्यांगांच्या मदतीसाठी शालेय विद्यार्थ्यांची नियुक्ती मदतनीस म्हणून केली जाणार आहे.**
**– स्नेहा उबाळे, निवडणूक उपजिल्हाधिकारी, रायगड**

## शासकीय विश्रामगृहाला टाळे

### चार वर्षे दुरुस्ती न केल्याने दुरवस्था

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड हे पर्यटनस्थळ असून, येथे मंत्रालयातील अनेक मान्यवर तसेच शासकीय अधिकाऱ्यांची ये-जा करीत असतात. परंतु, शासकीय विश्रामगृह नसल्याने अधिकारीवर्गाला खासगी लॉजिंगमध्ये आसरा घ्यावा लागत आहे. कोविड १९ पासून मुरुडच्या शासकीय विश्रामगृहाचा ताबा ग्रामीण रुग्णालयाने घेतला होता. कोरोनाग्रस्तांवर इलाज करण्यासाठी सदरचे विश्रामगृह वापरात आणले जात होते. परंतु, मागील चार वर्षांपेक्षा जास्त काळ हे विश्रामगृह बंद ठेवण्यात आले असून, याचा



वापरच बंद करण्यात आला आहे.

मुरुडला भेटी देणारे आमदार, खासदारांना खासगी इमारतीमध्ये कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घ्याव्या लागत आहेत. मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विश्रामगृहाच्या दुरुस्ती व देखभालीकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात येत आहे. समुद्रकिनारी असणारे शासकीय विश्रामगृह सर्वांना आवडीचे व राहण्याची उत्तम व्यवस्था असणारे ठिकाण असूनदेखील या विश्रामगृहाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

मागील चार वर्षांपासून हे विश्रामगृह बंद •> पान ५ वर

# मोदींची कर्जकहाणी

नरेंद्र मोदींनी दहा वर्षांमध्ये एकही पत्रकार परिषद घेतली नाही. लोकशाही म्हणवणाऱ्या देशाच्या पंतप्रधानाने पत्रकार परिषद न घेण्याचा हा जागतिक विक्रम असावा. परिषद घेतली तर कोणता पत्रकार कधी कोणता अडचणीचा प्रश्न विचारेल याचा नेम नसतो. शिवाय आजकाल अशा परिषदा लाईव्ह असतात. त्यात केलेल्या चुका किंवा चेहऱ्यावरचे हावभाव सर्व काही कॅमेऱ्यात पकडले जात असते. मोदींना याचीच भीती वाटते. सध्या त्यांनी आपल्या भाषणांमधून खोटे बोलण्याचा सपाटा लावला आहे. काँग्रेस तुमची संपत्ती काढून घेऊन ती मुस्लिमांना देणार आहे असा खोटा प्रचार ते करीत आहेत. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात असे कोठेही म्हटलेले नाही. काँग्रेस तसे म्हणूही शकणार नाही. या देशातील संपत्तीवर पहिला हक्क दलित, आदिवासी, मागास, गरीब इत्यादींचा असायला हवा असे उद्गार तेव्हाचे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी २००६ मध्ये काढले होते. त्याचा चुकीचा अर्थ लावून मोदी तद्दन खोटा प्रचार करीत आहेत. उद्या पत्रकार परिषद घेतली तर मोदींना कोणीतरी तुम्ही खोटारडेपणा का करीत आहात असा स्पष्ट प्रश्न करू शकतो. हे मोदींना अर्थातच होऊ द्यायचे नाही. त्यावर तोडगा म्हणून त्यांनी आता काही वृत्तवाहिन्यांना मुलाखती देणे सुरु केले आहे. पण यात विचारले जाणारे प्रश्न पंतप्रधान कार्यालयच लिहून देत असावे इतके सामान्य असतात. मोदींना अडचणीत आणेल असा एकही सवाल त्यात नसतो. शिवाय, एखाद्या प्रश्नावर मोदी जे बोलतील ते ऐकून घ्यायचे, प्रतिप्रश्न करायचे नाहीत असा हा सगळा मामला असतो. अशाच एका मुलाखतीत मोदींनी शिवसेना इत्यादींवर बरेच भाष्य केले आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे माझ्यावर असलेले ऋण फेडण्यासाठीच मी शिंदे गटाच्या कमी जागा असतानाही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले असे मोदी यांनी यात म्हटले आहे. हा एक मोठाच विनोदी पण दिशाभूल करणारा दावा आहे.

## बिहारमध्ये कोणाचे कर्ज?

गुजरातचे मुख्यमंत्री असताना ठाकरे यांनी आपल्याला पाठिंबा दिला व ते त्यांचे कर्ज वा उपकार आपल्यावर आहेत असे मोदी यांना म्हणायचे आहे. तसे ते नेहमी सांगतात. मात्र हा निव्वळ शिवसैनिकांना भावनिक घोळात घेण्याचा प्रकार आहे. मोदींच्या भाजपचा शिवसेनेसोबतचा व्यवहार नेमका त्याच्या उलट राहिलेला आहे. २०१४ मध्ये भाजपने सेनेसोबतची युती तोडली होती. त्यावेळी सेना काँग्रेससोबत गेली अशी काही सबबही नव्हती. नंतर पुन्हा दोन्ही पक्ष एकत्र आले तरीही सेनेला संपवण्याच्या दृष्टीनेच मोदी व शाह यांनी हालचाली केल्या. एकनाथ शिंदे यांना बंड करायला फूस देणे, त्यांना सर्व रसद पुरवणे, न्यायालय व निवडणूक आयोगात मदत करणे या गोष्टी भाजपने केल्या. त्यावेळपर्यंत बाळासाहेबांची सेना कोणती हे ठरलेले नव्हते. आतादेखील चिन्ह व नाव शिंदे यांना मिळाले तरीही लोक त्यांच्यासोबत आहेत की नाही याचा फैसला झालेला नाही. तो चार जूनला होईलच. उद्या समजा शिंदे गटाला थोड्याफार जागा मिळाल्याच, तरीही तो गट हा पूर्णपणे मोदींच्या ताटाखालचे मांजर म्हणून राहणार आहे. शिवसेना अशी दुबळी होऊन हळूहळू नष्ट व्हावी हेच भाजपचे ध्येय आहे. बाळासाहेबांच्या उपकारांमुळेच शिंदे यांना आपण मुख्यमंत्री केले हे विधान मोदी किंवा शाह यांनी यापूर्वी केलेले नाही. आता निवडणुकीचे पहिले दोन टप्पे पार पडल्यावर आणि उद्धव ठाकरे यांना मिळणारा जबरदस्त प्रतिसाद पाहिल्यावर त्यांना ती उपरती झालेली आहे. दुसरे म्हणजे हे महाराष्ट्रात समजा हे ठीक आहे. पण मग बिहारमध्ये मोदींवर कोणाचे कर्ज आहे हेही त्यांनी सांगून टाकावे. तिथे एक नव्हे तर दोन वेळा नितीश यांच्या जागा कमी असतानाही त्यांना भाजपने मुख्यमंत्रिपद दिले. पहिल्यांदा नितीश सोडून गेल्यावर त्यांना कायमचे दरवाजे बंद असे अमित शाह म्हणाले. तरीही यंदा पुन्हा नितीश भाजपकडे आले. त्यांच्या जनता दलाच्या ४४ आणि भाजपच्या ८५ जागा असूनही पुन्हा मुख्यमंत्रिपद नितीश यांनाच मिळाले.

## आणि दादांचे काय?

आणखीही एका प्रश्नाचे उत्तर मोदींनी द्यायला हवे. शिंद्यांच्या मुख्यमंत्रिपदाचे रहस्य कळले. पण मग अजितदादांच्या उपमुख्यमंत्रिपदाचे काय? शिवसेना आणि भाजप यांचे सरकार ठीक चाललेले असताना दादांना सोबत घेण्यामागे मोदींवर कोणाचे कर्ज कारणीभूत होते हेही आता त्यांनी सांगून टाकावे. शिंदे यांना फोडले असले तरी जनतेचा पाठिंबा महाविकास आघाडीला आहे हे भाजपच्या लक्षात आले होते. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस व मुख्यतः शरद पवार यांच्यावर प्रहार करणे आवश्यक झाले होते. त्याकरताच दादांना फोडण्यात आले हे आता स्पष्ट झाले आहे. बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्याचा आग्रहही दिल्लीतूनच धरला गेला, जेणेकरून पवारांच्या बालेकिल्ल्यातच त्यांची ताकद खलास व्हावी असा हा सगळा डाव आहे. सुप्रिया विरुध्द सुनेत्रा या निवडणुकीमुळे आज पवारांची ताकद विभागली गेली आहे. ही दरी सांधणे सोपे नाही. यात निवडून कोणीही आले तरी दुसरा गट हा बराच खच्ची होईल असा भाजपचा होरा आहे. यासाठी दादांविरुध्दच्या खटल्यांचा उपयोग करून घेऊन त्यांना भाजपकडे यायला भाग पाडले गेले हे उघड आहे.शिंदे आणि राष्ट्रवादीवाले देखील काहीही कारणे देत असले तरी निव्वळ इडीच्या भीतीने व सत्तेसाठी लाचार होऊनच ते भाजपच्या वळचणीला गेले आहेत हे लपणारे नाही. रायगडातले राष्ट्रवादीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्यावर सिंचन घोटाळ्यातील भ्रष्टाचाराचे सावट कायम आहे. त्या संदर्भातला एक खटला उच्च न्यायालयात दाखल आहे. मुद्दा असा की, जो भाजप आणि ही सर्व सत्तालंपट मंडळी तत्वाच्या गप्पा मारत असली तरी ती सत्तेसाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात. त्याला अमुकचे कर्ज वगैरे म्हणून भावनिक मुलामा दिला तरी सामान्य जनता खोट्या कहाण्यांना भुलणारी नाही.

विचार

# मुस्लिम आरक्षणाची अफू

**कर्नाटकमध्ये आता मुस्लिमांना सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण दिले जात आहे. काँग्रेसने सर्व मुस्लिमांना ओबीसी कोट्यात टाकून ओबीसी बनवले आणि या समाजातील आधीच्या लोकांना दिलेले आरक्षण निरर्थक केले, असा आरोप मोदी यांनी केला. या निर्णयावर राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने कर्नाटक सरकारकडून स्पष्टीकरण मागवले आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत हा विषय चर्चेत आहे. त्याबाबतचा हा वृतांत.**



**जनार्दन पाटील**

राजकारणाचे विविध कंगोरे आणि विविध बाजू असल्या तरी जाती, धर्माच्या नावाने होणारे राजकारण नेहमीच अफूच्या गोळीसारखे असते, हे नाकारुन चालणार नाही. एकदा ते दिले की लोक गुंगीत राहतात आणि मग वास्तविक प्रश्नांची जाणही राहत नाही. एकदा लोकांना भावनिक राजकारणात गुंतवले की त्या लहरीवर निवडणूक जिंकता येते, हे एव्हाना राजकारण्यांना चांगलेच समजले आहे. त्यातून मुस्लिमांच्या कल्याणाची भाषा करायची आणि त्याच मुस्लिमांना काही द्यायची वेळ आली की हिंदुत्त्ववाद्यांचे तुष्टीकरण करायचे, असेही वारंवार बघायला मिळते. कर्नाटकमध्ये पूर्वीच्या काँग्रेसच्या सरकारने मुस्लिमांना चार टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र भाजपने तो रद्द करून लिंगायत आणि वोक्कलिंगा समाजामध्ये ते आरक्षण वाटून टाकले. असे असताना तेव्हा त्यात राजकारण नव्हते का, असा प्रश्न उपस्थित केला गेला. आरक्षण धर्मावर आधारित नसावे, याबाबत दुमत नाही; परंतु एखाद्या धर्मात काही गरीब असतील तर त्यांना ओबीसीतून आरक्षण देता येते. महाराष्ट्रात मराठा आणि धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सुटलेला नाही. न्यायालयानेच या मागण्या फेटाळल्या आहेत. परंतु मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ठ नसतानाही राज्य सरकारने निर्णय घेऊनही आरक्षण दिले नाही. आता मात्र काँग्रेस सरकारने कर्नाटकमध्ये ते लागू केले आहे. यावरुन देशात रण माजले.

कर्नाटकमध्ये मुस्लिम आरक्षणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अकांडतांडव करत असताना २९ वर्षांपूर्वी एच. डी. देवेगौडा यांनी सर्वात आधी मुस्लिम आरक्षणाचा निर्णय घेतला होता हे लक्षात घ्यायला हवे. मात्र त्यांच्याच मांडीला मांडी लावून लोकसभा निवडणुकीचा प्रचार करणाऱ्या पक्षांनी याबद्दल त्यांना जाब विचारल्याचे ऐकिवात नाही. शिवाय कर्नाटकमध्ये मुस्लिम आरक्षणाचा प्रश्न गंभीर नाही. आसाम, पश्चिम बंगाल आदी राज्यांमध्ये मुस्लिमांचे प्रमाण जास्त असले तरी तिथे मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा नाही. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये मुस्लिमांच्या मागासलेपणाचे प्रमाण अधिक आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती वाईट आहे. मुस्लिमांमधील काही जातींचा ओबीसींमध्ये समावेश करण्यात आला आहे. कर्नाटकमध्ये मुस्लिमांना सरसकट ओबीसीत आरक्षण देण्याचा निर्णय न्यायालयात टिकणार नसला तरी त्याचे राजकीय भांडवल करण्याचा काँग्रेसचा पुरेपूर प्रयत्न आहे. अर्थात हे कोलीत काँग्रेसनेच ऐन निवडणुकीच्या काळात भाजपच्या हाती दिले. आता हा लोकसभा निवडणुकीतला मुख्य मुद्दा बनला आहे. याबाबत भाजप सातत्याने काँग्रेसवर हल्लाबोल करत आहे. सर्व मुस्लिमांचा ओबीसी कोट्यात समावेश करून काँग्रेस मागासवर्गीयांचे हक्क नष्ट करत असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानेही कर्नाटक सरकारचा निर्णय घटनात्मकदृष्ट्या चुकीचे असल्याचे म्हटले आहे. यामुळे काँग्रेस बॅकफूटवर गेली असल्यास नवल नाही.

खरे तर देशातील आरक्षण व्यवस्था धर्मावर आधारित नसून सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित लोकांसाठी आहे. भारतामध्ये आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या मुस्लिम जातींचा समावेश ओबीसींमध्ये केला जातो. ही व्यवस्था राज्यघटनेच्या कलम १६(४) अन्वये करण्यात आली आहे. कर्नाटकसह भारतातील पाच राज्यांमध्ये सर्व मुस्लिमांना आरक्षणाचा लाभ दिला जातो. यासाठी संबंधित राज्यांमधील सर्व मुस्लिमांना ओबीसी मानण्यात आले आहे. तेलंगणातील विधानसभा निवडणुकीतही या मुद्द्याने जोर पकडला होता. देशात केंद्रीय ओबीसी यादीत किंवा राज्याच्या यादीत समावेश असणाऱ्या मुस्लिम जातींनाच आरक्षण मिळते. असे असले तरी राज्ये वेळोवेळी या याद्यांमध्ये बदल करतात आणि त्यात इतर जातींचा समावेश करतात. यामध्ये केरळ आणि तामिळनाडू आघाडीवर आहेत. याशिवाय तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकचाही या राज्यांमध्ये समावेश आहे. विशेषत: तेलंगणामध्ये माजी मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांना मुस्लिमांसाठी ओबीसी उपश्रेणीतील निश्चित चार टक्के आरक्षण वाढवून बारा टक्के करायचे होते. त्यांनी विधानसभेत तसा ठरावही केला होता. मात्र केंद्र सरकारने तो फेटाळला. देशातील इतर राज्यांमध्ये ही प्रणाली लागू आहे. बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि राजस्थानसह उत्तर भारतातील सर्व राज्यांमध्ये केवळ मुस्लिमांच्या मागासलेल्या जातींनाच ओबीसी कोट्यातील आरक्षणाचा लाभ दिला जातो. असे असताना कर्नाटकमध्ये मात्र गदारोळ झाला.

कर्नाटकमध्ये आरक्षणाच्या मुद्यावरून झालेल्या गदारोळाची संहिता राज्यात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या नसतानाच्या काळातच लिहिण्यात आली आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या काही दिवस आधी माजी मुख्यमंत्री बोम्मई यांनी कर्नाटकमधील सर्व मुस्लिमांना ओबीसी कोट्यातून दिलेले चार टक्के आरक्षण रद्द केले होते. राज्यातील ओबीसींसाठी राखीव असणाऱ्या ३२ टक्के कोट्यामध्ये चार टक्के अशी उपश्रेणी तयार करण्यात आली होती. भाजपने हा कोटा लिंगायत आणि वोक्कलिंगा समाजामध्ये विभागला. त्यानंतर देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी तेलंगणामध्ये आपले सरकार आल्यास मुस्लिमांसाठीचे चार टक्के आरक्षण रद्द करण्यात येईल, असे म्हटले होते. मात्र तिथे काँग्रेसचे सरकार आले. काँग्रेसने मुस्लिमांचे आरक्षण रद्द करण्याच्या कर्नाटकमधील तत्कालीन भाजप सरकारच्या निर्णयाला विरोध केला होता आणि आपले सरकार सत्तेत आल्यास मुस्लिमांचा कोटा पुनर्संचयित करू, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण रद्द करण्याच्या भाजपच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यामुळे आरक्षण लागू करण्याचा अधिकार राज्यात नव्याने सत्तेत आलेल्या काँग्रेसला मिळाला. मागासवर्ग आयोगाचे म्हणणे आहे की, कर्नाटक सरकारने सर्व मुस्लिम समाजाचा समावेश ओबीसीमध्ये केला आहे. याचा अर्थ कर्नाटकमध्ये आता मुस्लिमांना सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण दिले जात आहे. काँग्रेसने सर्व मुस्लिमांना ओबीसी कोट्यात टाकून ओबीसी बनवले आणि या समाजातील लोकांना दिलेले आरक्षण तोडले, असा आरोप मोदी यांनी केला. या निर्णयावर राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने कर्नाटक सरकारकडून स्पष्टीकरण मागवले.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १६ नुसार प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळण्याची समान संधी असायला हवी. जात, धर्म, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर कोणाशीही भेदभाव केला जाऊ शकत नाही. अनुच्छेद १६(४) अन्वये सरकारी सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व मिळवू न शकणाऱ्या मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद करण्याचा अधिकार राज्याला आहे. मागासवर्गीयांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती समाविष्ट आहेत. बालाजी विरुद्ध म्हैसूर राज्य (१९६३) प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना म्हटले होते की, केवळ जातीच्या आधारावर समाजाच्या मागासलेपणाचा निर्णय होऊ शकत नाही. यामध्ये त्यांची गरिबी किंवा ते कुठे राहतात याचाही विचार करावा लागेल. टी. देवदशन विरुद्ध केंद्र सरकार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीयांच्या नोकऱ्यांमध्ये पुढील वर्षापर्यंत रिक्त पदे ठेवण्याचा नियम घटनाबाह्य ठरवला आहे. कोणत्याही वर्षी रिक्त पदे भरल्यामुळे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाल्यास हा नियम संविधानाच्या विरुद्ध असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. हा ५० टक्क्यांचा नियम कलम १६(४) अंतर्गत केलेल्या अस्सल आरक्षणांनाच लागू होतो.

आंध्र प्रदेशमधील मुस्लिमांना एससी/एसटी आरक्षण देण्याचा प्रयत्न हा एक पायलट प्रोजेक्ट होता. काँग्रेसला संपूर्ण देशात हा प्रयत्न करायचा होता. २००४ ते २०१० या काळात काँग्रेसने आंध्र प्रदेशमध्ये चार वेळा मुस्लिम आरक्षण लागू करण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या सजगतेमुळे ते आपला हेतू पूर्ण करू शकले नाहीत, अशी टीका मोदी यांनी केली. हे सर्व संविधानाच्या मूळ भावनेच्या विरुद्ध असल्याचे माहीत असतानाही काँग्रेसने राजकारण आणि व्होटबँकेसाठी अनेकविध प्रयत्न केले. मुस्लिम कोटा लागू करणारे आंध्र प्रदेश हे पहिले राज्य आहे.

कर्नाटकमध्ये मुस्लिम लोकसंख्या १३ टक्के आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे आयोगाने म्हटले आहे की सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या जाती आणि गटांकडे संपूर्ण धर्माच्या पातळीवर पाहिले जाऊ शकत नाही. कर्नाटकमध्ये मुस्लिम समाजातील सर्व जाती आणि गट सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले असल्याचे विधान योग्य नाही. मुस्लिम समाजात काही वर्ग दीर्घकाळापासून वंचित आहेत आणि त्यांना समाजातच भेदभावाचे बळी बनवले गेल्याचे आयोगाने मान्य केले आहे. मात्र यात सरसकट सगळ्यांचा समावेश होत नाही. एकूणच प्रश्न गुंतागुंतीचा असला तरी आरक्षणाला विरोध आढळत आहे. मुस्लिम समाजात जातिव्यवस्था नाही, असे आयोगाने म्हटले आहे. परंतु व्यवहारात इस्लाम जातिवादापासून मुक्त आहे, असे ठामपणे सांगता येणार नाही. म्हणजेच या आरक्षणाचे विविध कंगोरे लक्षात घेऊन न्यायालयानेच निवाडा करणे आवश्यक आहे.

आजकाल

# शेतीतील वाढता खर्च आणि पाण्याची समस्या

**सोमिनाथ घोळवे**

२०१४ ते २०२४ या कालावधीत शेती कसण्यासाठी लागणारे आवजारे, रासायनिक खते, कीटकनाशके, शेतमाल वाहतूक, पेट्रोल - डिझेल व इतर यांचे भाव जवळजवळ १५० ते २५० टक्क्यांनी वाढले आहेत. मात्र शेतीतून निघणाऱ्या शेतमालाचे भाव आहे तेच आहेत. किंबहुना काही शेतमालाचे भाव कमी झालेले दिसून येतील.

उदा. १. रासायनिक खताचे भाव किती वाढलेत पहा.
२.पाईप लाईनसाठी टाकणाऱ्या नळी २०१४ साली किती रुपयांना मिळत होती आज काय भाव आहे ते पहा.
३. टॅक्टरचे भाव पहा.
४. कीटकनाशकांचे वाढलेले भाव पहा.
५ पेट्रोल - डिझेल महाग झाल्याने टॅक्टरने नांगरटीचे भाव काय वाढलेत ते पहा.

या तुलनेत शेतमालाचे २०१४ साली आणि आता काय भाव वाढले आहेत ते पहा.
१. सोयाबीनचे भाव पहा.
२. ज्वारी, बाजरी, भरड धान्य याचे भाव किती वाढले पहा.
३ कांद्याचे भाव पहा.
४ शेतीला जोड व्यवसाय म्हणून करणाऱ्या दूधाला काय भाव आहे हे पहा. (दुधाचा तर ३८ वरून २६ रुपयांवर भाव आणला.)
५ इतरही शेतमालाचे भाव तपासता येतील.

अर्थात एका बाजूने शेतीतील गुंतवणूक प्रचंड वेगाने वाढत आहे. मात्र त्या गुंतवणुकीचा परतावा शून्य किंवा कमी येत असेल, तर देवांचा देव आणून शेती करायला लावली तरीही शेती परवडणार नाही हे सत्य आहे. मात्र यास सरकारचे शेतमाल विक्रीच्या संदर्भात जे धोरणे आहेत त्यास जबाबदार न धरता नैसर्गिक आपत्तीला ( हवामान बदल, पाऊस, रोगराई, अतिवृष्टी, दुष्काळ) धरले जाते. या सर्वांमध्ये शेतकऱ्यांना तग धरून राहण्यासाठी उत्पन्नातून पैसे तर जवळ येईला हवे, तेच धोरणामधून कमी केले आहेत. तग धरून राहण्यासाठी उपाय म्हणून अनुदान, शेतकरी सन्मान निधी, मदत दिले जाते. मात्र हे यावरील उपाय नाहीत. त्यातही मदत आणि अनुदान कोणाला मिळते तर कोणाला मिळतही नाही.

चालू वर्षी शेतकऱ्यांच्या समोर शेती कसण्याचे सर्वात मोठे आव्हान असणार आहे. शेतकरी सन्मान निधीचे दोन हजार रुपये एक एकर शेतीची नांगरट करण्यास पुरणार नाहीत. बाकीच्या गुंतवणुकीचे काय ? दुष्काळामुळे पीककर्ज परत केले नसल्याने बँक किंवा इतर संस्था पीककर्ज देणार नाहीत. कृषी सेवा केंद्राची गेल्यावर्षाची उधारी दिली नसल्याने ते देखील चालू वर्षी उधार देणार नाहीत. अशा अनेक समस्यां शेतकऱ्यांच्या समोर वाढल्या आहेत. एक प्रकारे धोरणांनी व्यापलेला चक्रव्युह आहे, त्यातून बाहेर कसे पडणार हा मोठा प्रश्न आहे.

..............................

पाणी २४ तास विकत मिळणार. तेही १ रुपयाला १ लिटर. अलीकडे कोणत्याही जिल्ह्यात जा. पाणी विक्री - व्यापार वर्षभर चालू आहे. दुष्काळ असला काय, नसला काय या पाणी - विक्री व्यवसायाला काहीच फरक पडत नाही. त्यामुळे पाणी व्यवसायाने मोठ बाळस धरलं आहे. शासन शुद्ध पाणी पुरवठा करण्यास अपयशी ठरल्याने हा व्यवसाय फोफावला आहे.

हळूहळू जुन्या सार्वजनिक पाणी पुरवठा व्यवस्था मोडीत निघणे आणि नवीन सुरू करण्यात येणाऱ्या व्यवस्था हितसंबंधानुसार आहेत. शिवाय शाश्वत पाण्याची स्त्रोत नसलेल्या ठिकाणी असल्याने पाणी पुरवठा यंत्रणा ढासळत चालली आहे. भूगर्भातील पाणी पातळी घसरल्याने क्षारयुक्त पाणी मिळवावे लागते. त्या पाण्याने अनेक आजार होत असल्याने शुद्ध पाण्याच्या शोधात मध्यमवर्गीय आहेत. पण ज्या परिसरात पाणी सार्वजनिक व्यवस्थेद्वारे मिळत नाही. त्यांना या आरओ चे पाणी विकत घेण्याशिवाय पर्याय नाही. आगदी कामगारांना देखील हेच पाणी घ्यावे लागते. त्यामुळे पाण्याला रंग नाही, पाण्याला चव नाही. तरीही आर्थिक मूल्य दिवसेंदिवस वाढ होत चालले आहे. गेल्या दोन दशकांपासून वेगाने विकसित होणारी पाणी बाजारपेठ आहे. सद्यस्थितीत शहरांमध्ये नाहीतर खेड्यांमध्ये देखील पाणी विक्रीतून भयंकर असे अर्थकारण उभे राहिलेले आहे. यात राजकीय नेतृत्व आणि त्याचे कार्यकर्ते यांचे मोठे अर्थकारण गुंतलेलं आहे. त्यामुळंच पाणी पुरवठ्याच्या मागणीला फारसे गांभीर्याने घेतले जात नाही. पाणी पुरवठ्याच्या बाबतीत उदासीनता दाखवली जात आहे.

पाण्याच्या या वाढत्या बाजारपेठेने तळागाळातील वर्गामध्ये मोठ्या चिंताही निर्माण केल्या आहेत. आरओ हे खनिज मुक्त पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे साधन बनले आहे. खरंच तसे असते का? हा प्रश्न आहेच. एकंदर व्यावसायिक आरओ प्लांट्सपासून ते घरगुती आरओ प्लांट्सपर्यंतच्या पाण्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह आहे.

लोकसंसद

## नेपाळी नोटेवर भारताचा भूभाग

नेपाळच्या १०० रुपयांच्या नोटेवर भारताचे तीन भाग दाखविण्यात आले आहेत . ही बातमी नुकतीच वाचली . त्यामुळे नवीन वादाला सुरवात झाली आहे . नेपाळी पंतप्रधान पुष्प कमल दहल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक भरली होती त्यात ह्या नवीन नोटेच्या डिझाईनला मंजुरी देण्यात आली . या नोटेवर भारताचे लिपूलेख, लिंपियाधुरा आणि कालापानी हे भाग आहेत . या अगोदर नेपाळने २०२० मध्ये देशाचा राजकीय नकाशा तयार केला होता . त्यात्या नेपाळने ही तिन्ही भाग नेपाळचे असल्याचे जाहीर केले होते . त्यावेळी भारताने याला जोरदार हरकत घेतली होती आता पुन्हा हा विषय नेपाळने उकरून काढला आहे . नेपाळ हे खरेतर भारताचे मित्र राष्ट्र आहे . भारताने नेपाळला वेळोवेळी खूप मदत केली आहे . आता चीनच्या छुप्या साहाय्याने तो भारतावर कुरघोडी करत आहे . भारतीय परराष्ट्र खात्याने एकदा कडक समज नेपाळला द्यावयास हवी एक शेजारी राष्ट्र म्हणून नेपाळची ही वागवूक निषेधार्य आहे यात शंका नाही . भारत सरकारने या बाबतीत कडक धोरण स्वीकारले पाहिजे

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**सहा मे**

**१८६४ :-**कवी, अनुवादक, तत्त्वचिंतक, संस्कृतचे गाढे अभ्यासक आणि एक शैलीदार लेखक असा नावलौकिक संपादन केलेल्या महादेव हरी मोडक यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील पडघवली या गावी ६ मे १८६४ रोजी झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण रोहा व अलिबाग येथून घेतल्यावर पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून 'भाषाशास्त्र' हा विषय घेऊन बी.ए. झाले. पुढे मुंबई, अहमदनगर येथे काही काळ शिक्षकाची नोकरी केली. तो काळ राष्ट्रीय विचारांनी मंतरलेला, मोडकांनी शिवजयंती उत्सवात ते भाग घेतल्याने ब्रिटिशांच्या रोषाला बळी पडले. परिणामी, नोकरीचा राजीनामा द्यायला लागला. तेव्हा उदरनिर्वाहासाठी त्यांनी शिकवण्या घेतल्या. **१८८८:-** संतकवी व ग्रंथकार बाळाबोवा ज्ञानेवरी (थेटे) यांचे निधन. **१९२२:-** लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांचे निधन. प्रत्यक्ष साहित्य निर्मिती केली नसली तरी साहित्य निर्मितीला प्रोत्साहन दिले. त्यांची भाषणे 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे भाग १,२ संपादक म. बा. जाधव' या ग्रंथातून शाहू महाराजांच्या पुरोगामी विचारांचे दर्शन घडते. **१९३२:-** नाटयदिग्दर्शन आणि नाटयसमीक्षेत रुची असणाऱ्या लेखिका प्रा. डॉ. कल्पना दिगंबर परांजपे यांचा जन्म. ह्यांचा 'मराठी सामाजिक नाटक आणि स्त्री समस्या' हा ग्रंथ प्रसिध्द. तसेच नाटयदिग्दर्शन व नाटकांचे समीक्षालेखन यात त्यांना रुची होती. **१९३७:-** लेखक प्रा. सुरेश हरी थत्ते यांचा जन्म. ह्यांनी १९६२ च्या चीनी आक्रमणाच्या वेळेस 'समर गीते' हा काव्यसंग्रह रचला. तसेच 'संस्कार','सृजन' हा कथा काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९४२:-** सनातन संस्थेचे संपादक, हिंदू जनजागरण समितीचे प्रेरणास्थान, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मानसोपचारतज्ज्ञ दै.सनातन प्रभात या वृत्तपत्राचे संस्थापक आणि संपादक लेखक प. पू. डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा जन्म. 'साधना, राष्ट्र आणि धर्म' या विषयांवर आतापर्यत त्यांचे २१८ ग्रंथ प्रकाशित झाले असून अजून ३७८२ ग्रंथ प्रकाशित होऊ शकतील इतके ज्ञानसंग्रही आहे. **१९४३:-** 'कार्व्हर','आयडा स्कडर','सर्पतज्ज्ञ रेमंड डिटमार्स', 'रोझलिंड फ्रँकलीन' अशा मराठीभाषकांना अज्ञात असलेल्या चरित्रनायकांची थोरवी आस्थेने सांगणाऱ्या चरित्रकर्त्या वीणा चंद्रकांत गवाणकर (माहेरचे नाव सुलभा आजगावकर) यांचा जन्म. सलीम अलींवरही त्यांनी पुस्तक लिहिले आहे. **१९४३:-** वृत्तपत्रे, नियतकालिके यातून संशोधनपर लेखन करणाऱ्या लेखिका, संस्कृतच्या जाणकार प्रा. डॉ. विजया कृष्णराव देशमुख यांचा जन्म. 'भारतीय युध्द : खगोलिय संदर्भ'या ग्रंथातून त्यांनी महाभारतीय युध्दाचा काल निचित करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय 'महाभारतातील अवथामा','राष्ट्रभक्त अरविंद' आदी पुस्तके त्यांनी लिहिलीत. **१९५४:-** कवी वसंत आकिनवार यांचा जन्म. 'पुष्पगंधा, स्वप्नगधा' हे काव्यसंग्रह प्रकाशित. याशिवाय विविध वृत्तपत्रातून लेख व काव्यप्रकाशित. **१९६६:-** लेखक, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ रॅंग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांचे निधन. **१९७०:-** प्रकाशक, संपादक, लेखक गोपाळ गोविंद तथा दादासाहेब अधिकारी यांचे निधन. टीकाकार, 'मनोरमा' या मासिकाचे आणि 'मातृभूमी'या पत्राचे संपादक असणाऱ्या दादासाहेबांनी 'पठ्ठे बाबुराव चंद्रा पौळीवरील लावण्या' व 'लेंभे यांची कविता' या पुस्तकांचे लेखन तर 'सगनभाऊकृत लावण्या व पोवाड' आणि 'गडकरी यांच्या आठवणी' इ. पुस्तकांचे संपादक आणि काही मराठी पुस्तके प्रकाशित केली. **१९७१:-** विविध वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंक यातून महिला पुरवणी, बालसाहित्य, युवा साहित्य, कथा, कविता, समीक्षा लिहिणाऱ्या लेखिका प्रमिला शिवाजी कांबळे यांचा जन्म. **१९८१:-** लेखक कवी समाधान शिकतोड यांचा जन्म. 'माझा विद्यार्थी' हा काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९९५:-** बालसाहित्यिका, शिक्षणखात्यात एज्युकेशनल इन्स्पेक्टर शालेय वयातच 'सरोज' ही छोटी कादंबरी प्रसिध्द. ग्रीमच्या परिकथांचे रसाळ अनुवाद त्यांनी केले. 'छोटी नीरा',' छोटा लाल बुट','किलबिल','गंमतीदार किटली','पांढरे भूत', 'अलिबाबाची गुहा' अशी अनेक पुस्तके लहान मुलांसाठी त्यांनी लिहिली. **२००१:-** मराठीतील स्त्रीवादी लेखनाला कथा-कादंबऱ्यांची कलात्म उंची देणाऱ्या मालतीबाई बेडेकर (माहेरचे नाव बाळूताई खरे) म्हणजेच 'विभावरी शिरुरकर, बी.ए (लिखाणासाठी टोपणनाव) यांचे निधन. हिंगण्यात शिकताना, तसेच पुढे सरकारी (शिक्षण खात्यातील) नोकरीतून अन्य महिलांची जी दु:खे त्यांना दिसली, ती या समाजात स्त्रीजन्मास येणे याचा कारणामुळे कशी आलेली आहेत हे त्यांना जाणवले, त्यांतून 'कळयांचे नि:श्वास' हे अक्षरलेणे साकार झाले. 'हिंदोळयावर','विरलेले स्वप्न','जाई','शबरी' या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'खरे मास्तर' (पहिली आवृत्ती १९५३) हे आत्मपर पुस्तक त्यांनी तटस्थतेने लिहिले, तसेच 'पारध' आणि 'वहिनी आली' ही नाटकेही लिहिली. 'मनस्विनीचे चिंतन' हा लघुनिबंधसंग्रह त्यांच्या लिखाणातील स्त्रीवादाची जातकुळी दाखवून देतो. **२०१०:-** लेखक, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सक्रिय आंदोलक, साने गुरुजींबरोबर काम केलेले, तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या जडणघडणीत ज्यांचा सिंहाचा वाटा होता असे रामभाऊ मोहाडीकर (वय ९४) यांचे निधन. **२०१३:-** ज्येष्ठ संगीत समिक्षिका आणि उंबरठा या चित्रपटाच्या कथालेखिका शांता निसळ यांचे निधन. याशिवाय 'विसंवाद'ही कादंबरी. 'सुरभि' हा कथासंग्रह आणि 'सौभाग्यकांक्षिणी' हे नाटक अशी त्यांची साहित्य संपदा.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ मे
१) श्री. हरिश्चंद्र महादेव दिवकर
पाण्डवादेवी,अलिबाग, ६-५-१९४१
२) श्री. जनार्धन काशिनाथ पाटील
नवेनगर, अलिबाग, ६-५-१९४६
३)श्रीम.लतिका शरद देशपांडे
श्रीबाग-२, अलिबाग ६-५-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## सुशीला पवार यांचे निधन



**माथेरान :** स्वातंत्र्यसैनिक धोंडू पवार यांच्या पत्नी व स्व. पत्रकार संतोष पवार व पत्रकार गिरीश पवार यांच्या मातोश्री सुशीला धोंडू पवार यांचे कर्करोगाच्या दीर्घ आजाराने शुक्रवारी (दि.३) सकाळी १०.३० वाजता निधन झाले. निधनसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या. सुशीला धोंडू पवार यांनी माथेरानमधील बी.जे. हॉस्पिटल येथे आयाचे काम केले होते. आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊन त्यांना समाजकार्याची आवड निर्माण करून दिली.त्यानुसार त्यांच्या दोन्ही मुलांनी समाजकार्याचे व्रत घेऊन पत्रकारिता स्वीकारली. गेली चार वर्षांपासून त्यांना स्तनाच्या कर्करोगाने ग्रासले होते. कर्करोगाची झुंज अखेर संपली. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# हऱ्याचीवाडीत भीषण पाणीसंकट

## ग्रामस्थांवर डोंगर उतरून पाणी नेण्याची वेळ; खासगी बोअरवेलचा आधार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**कर्जत तालुक्यातील वारे ग्रामपंचायतीमधील हऱ्याचीवाडीमधील ३५ घरांवर पाणीटंचाईचे संकट सुरू आहे. तेथील पिण्याचे पाण्याचे सर्व स्त्रोत निष्फळ ठरल्याने स्थानिक ग्रामस्थांवर वाडीच्या पायथ्याशी जाऊन पाण्याने भरलेले हंडे डोक्यावरून वाहून नेण्याची वेळ आली आहे. स्थानिक आदिवासी लोक वाडीच्या पायथ्याशी असलेल्या विहिरीचे पाणी तसेच खासगी बोअरवेलचे पाणी आणून तहान भागवत आहेत.**



वारे ग्रामपंचायतीमधील हऱ्याचीवाडीमध्ये ३५ घरांची वस्ती आहे. या ग्रामपंचायतीमधील जांभुळवाडी, नवसूचीवाडी आणि हऱ्याचीवाडी या तीन आदिवासी वाड्या या दुर्गम भागात वसल्या आहेत. त्या आदिवासीवाड्यांचे पाण्याचे उद्‌भव क्षेत्र हे प्रामुख्याने डोंगराच्या पायथ्याशी असून, तेथे विहिरी खोदल्या आहेत. त्या विहिरींमध्ये चांगला पाणीसाठा आहे, पण तेथून वाडीपर्यंत पाणी डोक्यावर वाहून न्यावे लागत असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. पाण्याची टंचाई या वाडीमध्ये राहणाऱ्या आदिवासी लोकांनी एप्रिल महिन्यात अनुभवली असून, आता त्या पाणीटंचाईने भीषण रूप धारण केले आहे.वाडीसाठी खोदण्यात आलेल्या विहिरीला चांगले पाणी आजही आहे, मात्र ते पाणी वाडीपर्यंत नेण्याची व्यवस्था फेल गेली आहे.

वाडी मधील ३५ घरांच्या वस्तीसाठी येथे प्लास्टिक टाकी बसवली आहे. मात्र, तेथपर्यंत पाणी पोहोचत नसल्याने स्थानिक आदिवासी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याच्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सकाळी नऊ वाजेपर्यंत स्थानिक आदिवासी महिला आपल्या मुलाबाळांना घेऊन पाणी आणण्यासाठी पायपीट करीत असतात. तर, संध्याकाळी पाचनंतर पुन्हा एकदा अशीच स्थिती या वाडीमध्ये दिसून येते.

सध्या लग्नसराई सुरू असून, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी खासगी टँकर मागवावा लागत आहे. तर, डोंगर चढून पाणी आणावे लागत असल्याने महिलांची होणारी दमछाक लक्षात घेऊन काही ग्रामस्थ आठ दिवसांनी पैसे गोळा करतात आणि पाण्याचा टँकर मागवून पिण्याच्या पाण्याची तहान भागवतात. त्याच भागात एका बांधकाम व्यावसायिक यांच्याकडे असलेल्या बोअरवेलला चांगले पाणी लागले आहे. त्या बोअरवेलमधून ग्रामस्थांना पिण्याचे पाणी दिले जात असते. मात्र, असे असताना वारे ग्रामपंचायत आणि कर्जत पंचायत समिती यांचे अजिबात लक्ष वाडीमधील पाणीटंचाईकडे नाही असे दिसून येत आहे. ग्रामस्थांवर ओढवलेल्या या पाणी संकटाबद्दल कोणालाही सोयरसुतक नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे आदिवासी ग्रामस्थ संतप्त असून, आम्ही साधे पिण्याचे पाणी देत नसलेल्या सरकारी यंत्रणेवर आपला संताप व्यक्त केला.

# उल्हास नदीच्या तीरावरच पाणीटंचाई

**चारही बोअरवेल नादुरुस्त**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रुप ग्रामपंचायतीमधील वावे गावात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या गावात पाणीटंचाईची परिस्थिती उद्‌भवली आहे. दरम्यान, गावातील चारही बोअरवेल नादुरुस्त झाल्याने आणि नवीन नळपाणी योजनेचे काम रखडल्याने वावे गावात पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

१५० घरांची वस्ती असलेल्या उमरोली ग्रामपंचायतीमधील वावे गावाच्या बाजूने उल्हास नदी वाहते. या नदीवर कर्जत तालुक्यातील अनेक गावांच्या नळपाणी योजना आहेत. मात्र, वावे गावासाठी नव्याने बनविल्या जात असलेल्या जलजीवन मिशनमधील नळपाणी योजनेचे उद्‌भव उल्हास नदीवर नाही. जलजीवन मिशनमधून मंजूर झालेल्या नळपाणी योजनेचे उद्‌भव पाली भुतीवली धरण आहे. त्या योजनेचे काम अर्धवट असून, केवळ जलवाहिन्या टाकून झाल्या आहेत. मात्र, त्या जलवाहिन्यादेखील जमिनीखाली टाकण्यात आलेल्या नाहीत. नळपाणी योजनेचे काम जेमतेम झालेले असतानादेखील २० लाखांचे बिल ठेकेदाराला अदा करण्यात आले असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आहे.

> **बोअरवेल दुरुस्त करणारे कोणतेही कर्मचारी पंचायत समितीकडे नाहीत. मात्र, त्या बोअरवेल संबंधित ग्रामपंचायतीने दुरुस्त करून घ्यायच्या असतात. त्याचे बिल अदा करण्याच्या सूचना लघुपाटबंधारे विभागाला जिल्हा परिषदेने दिल्या आहेत. त्यामुळे तेथील ग्रामविकास अधिकाऱ्यांनी बोअरवेल दुरुस्त करून घेण्याची कार्यवाही करावी.**
> **- चंद्रकांत साबळे, गटविकास अधिकारी, कर्जत पंचायत समिती**

> **बोअरवेल दुरुस्त करण्याची यंत्रणा कर्जत पंचायत समितीकडे असते. त्यामुळे त्यांनी या बोअरवेल दुरुस्त करून द्याव्यात आणि पाण्याची टंचाई दूर करावी.**
> **- गणेश धारणे, ग्रामस्थ, वावे**

### अधिकाऱ्यांना महिलांचा गराडा

**वावे गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई याबाबत माहिती मिळाल्याने पाहणी करण्यासाठी ४ मे रोजी लघुपाटबंधारे विभाग उपअभियंता सुजित धनगर, एक कनिष्ठ अभियंता आणि ग्रामविकास अधिकारी रतीलाल चौधरी हे गावात पोहोचले होते. त्यावेळी संतप्त महिलांच्या रोषाला अधिकाऱ्यांना सामोरे जावे लागले. नळपाणी योजनेचे काम वेळेत पूर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न केल्यानंतर तब्बल दोन तास मंदिरात बसून ठेवलेल्या अधिकारी वर्गाची अखेर सुटका झाली.**

# करकरेंना आरएसएस समर्थक पोलिसाने गोळ्या घातल्या

## विजय वडेट्टीवार यांचा खळबळजनक आरोप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात राज्य दहशतवादविरोधी पथकाचे (एटीएस) माजी प्रमुख शहीद हेमंत करकरे यांना कसाबने नव्हे तर, आरएसएस समर्थक पोलीस अधिकाऱ्यानं घातली, असा आरोप काँग्रेस नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. वडेट्टीवार यांनी माजी पोलीस अधिकारी एस.एम. मुश्रीफ यांच्या पुस्तकाचा दाखला देत हा खळबळजनक आरोप केला आहे. तसेच याप्रकरणी त्यांनी उज्ज्वल निकम यांनाही जबाबदार धरत भाजपवर हल्लाबोल केला आहे.



हेमंत करकरे यांना लागलेली गोळी कसाबच्या बंदुकीतील नव्हती. कोणत्याही अतिरेक्याची नव्हती. तर ती गोळी आरएसएस समर्थक एका पोलीस अधिकाऱ्याच्या बंदुकीतील होती. त्यावेळी हे पुरावे लपवणारा देशद्रोही कोण असेल तर तो उज्ज्वल निकम आहे. अशा देशद्रोह्याला भाजप तिकीट देत असेल तर देशद्रोह्याला पाठीशी घालणारा पक्ष आहे का, असा आरोप करत विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर जोरदार घणाघात केला आहे.

वडेट्टीवार पुढे म्हणाले, उज्जल निकम यांनी बिर्याणीचा मुद्दा उपस्थित करून काँग्रेसची बदनामी केली. कसाबला कोणी बिर्याणी देईल का? आणि याच उज्वल निकम यांनी आपली चूक मान्य केली होती. उज्वल निकम कसला वकील आहे? ज्या गोळीने हेमंत करकरे यांचा मृत्यू झाला ती गोळी कसाबने नव्हे तर आरएसएसशी एकनिष्ठ असलेल्या पोलीस अधिकाऱ्याने घातली होती हे सत्य न्यायालयापासून लपवणाऱ्या देशद्रोह्यांना भाजप तिकीट देत असेल, तर भाजप या गद्दारांना का पाठीशी घालत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, भाजपाकडून हे आरोप तथ्यहीन असल्याची टीका करण्यात आली आहे.

# वाढत्या उष्म्याने नागरिक हैराण

## थंड शीतपेयांकडे अनेकांचा कल

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**
वाढत्या उष्णतेने रौद्ररूप धारण केल्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे शरीराला गारवा मिळण्यासाठी चैत्राच्या आगमनाने वृक्षांना आलेल्या हिरव्यागार पानांच्या छायेखाली सावलीचा आधार घेतला जात आहे. तर, रणरणत्या उन्हामध्ये थंड पेय आणि फळे खरेदीसाठी नागरिकांची गर्दी झाल्याचे दिसून येत आहे.



सध्याच्या वाढत्या उष्म्यामुळे थंडावा मिळविण्यासाठी फ्रीजमधील व माठामधील थंड पाणी व विविध शीतपेये तसेच कलिंगड, काकडी, कोकम इत्यादी फळे खाण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. थंड पेये पिण्यासाठी तसेच पाण्याचे माठ खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होताना दिसून येत आहे. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी कलिंगड, काकडी तसेच थंड पेये विक्री करणाऱ्यांनी ठिकठिकाणी स्टॉल्स उभारले असल्याचे दिसत आहेत.

# मैदान सुशोभिकरणासाठी ८० लाखांचा खर्च

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
नेरळ गावातील ग्रामपंचायतीचे मालकीच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानाचे सुशोभिकरणाचे काम प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमामधून सुरू आहे. या मैदानात असलेल्या संरक्षण भिंती बांधण्यासाठी आणि तेथील दोन खोल्यांची दुरुस्ती करण्यासाठी तब्बल ८० लाखांचा निधी मंजूर आहे. दरम्यान, सरकारी निधी लाटण्यासाठी मैदानाचे दुरुस्तीचे काम मंजूर आहे काय, असा प्रश्न नेरळकर उपस्थित करू लागले आहेत.

नेरळ ग्रामपंचायतीचे मालकीच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानात शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमामधून सुशोभिकरण कामे करण्यासाठी निधी मंजूर आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून हा निधी खर्च केला जात असून, त्यासाठी ८० लाख रुपये मंजूर आहेत. या निधीमधून शिवाजी महाराज मैदानाच्या संरक्षण भिंती बांधणे तसेच तेथील दोन खोल्यांची दुरुस्ती करणे ही कामे मंजूर आहेत. मात्र, एवढा मोठा निधी आलेला असताना नेरळ ग्रामपंचायतीला आपल्या मालकीच्या मैदानात कोणती कामे होणार हे माहिती नाही, याचे नवल वाटत आहे.रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने नेरळ ग्रामपंचायतीकडून छत्रपती शिवाजी महाराज मैदान सुशोभिकरण कामाबाबत ठराव घेतले आहेत, त्याचवेळी काम पूर्ण झाल्यावर देखभाल दुरुस्ती करण्याचे ठरावदेखील घेतले आहेत. मात्र, तरीदेखील लोकसभा निवडणुकीपूर्वी कार्यादेश झालेल्या या कामाचे अंदाजपत्रक नेरळ ग्रामपंचायतीकडे नाही.ही बाब निश्चितच ठेकेदाराकडून शासनाचा निधी लाटण्याच्या दृष्टीने उचललेले पाऊल आहे, असा आरोप करण्यात येत आहे.



नेरळ ग्रामपंचायतीकडे कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याने जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे उपअभियंता खिल्लारे यांच्याकडे चौकशी केली असता सदर कामासाठी ८० लाखांचा निधी आहे, याची माहिती समोर आली आहे. दरवाजे आणि खिडक्यादेखील सुस्थितीत असल्याने छत्रपती शिवाजी महाराज मैदानात असलेल्या खोल्यांचे नक्की कोणते काम ८० लाखांच्या निधीमधून केले जाणार आहे, हा प्रश्नदेखील अनुत्तरित आहे.

पान ३ वरुन

## हाती मशाल, विजय विशाल

माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. हे भाजपाला मान्य नाही. याच कारणांनी ते संविधान बदलण्याची भाषा करत आहेत. इंडिया आघाडी संविधान कदापि बदलू देणार नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

निवडणूक रोख्यांमार्फत तुम्ही हजारो कोटी रुपये जमा केलेत. मात्र, देशातील आणि राज्यातील जनताच आमची संपत्ती (निवडणूक रोखे) आहे. तुमच्याकडे काळा पैसा आणि आमच्याकडे असणाऱ्या संपत्तीचा रंग भगवा आहे, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

देशाभरातील इंडिया आघाडीतील नेत्यांना, त्यांच्या नातेवाईकांना ईडी, सीबीआय, इनकम टॅक्स अशा यंत्रणांची भीती दाखवून त्यांना विनाकारण तुरुंगात डांबले जात आहे. भ्रष्टाचार करुन तुमच्या पक्षात आल्यावर ते शुद्ध होतात. तटकरेंविरोधात बैलगाडी भरुन भ्रष्टाचाराचे पुरावे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणले होते. आता त्याच तटकरेंना त्यांनी मांडीवर घेतले आहे.विनाशकारी प्रकल्प आमच्या कोकणात आणू पाहता आणि चांगले प्रकल्प गुजरातला पळवता. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता तुम्हाला कधीच माफ करणार नाही. आमचे सरकार आल्यावर गेलेले वैभव परत आणू, असा विश्वास ठाकरे यांनी उपस्थितांना दिला.फडणवीस बोलतात, मोंदीनी लस शोधली म्हणून जगातील जनतेला टोचता आली आणि त्यांचे जीव वाचले. असे असेल तर मग आपले शास्त्रज्ज्ञ काय गवत उपटत होते का, असा खरमरीत सवाल त्यांनी केला.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीची फसवणूक

शिवीगाळ करून असलेले अश्लील फोटो कुटुंबियांना पाठवण्याची धमकी दिली.

याबाबत आरोपीवर मुरुड पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेबाबत मुरुड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अविनाश राठोड अधिक तपास करीत आहेत.

## युवक बनणार दिव्यांग मदतनीस

अंमलबजावणीनंतर अशा प्रकारे दिव्यांग मतदारांना सेवा, सुविधा दिल्या जाणार आहेत. रायगड लोकसभा मतदारसंघात दिव्यांग मतदारांची संख्या लक्षात घेता जिल्हा निवडणूक विभागाने १७९५ मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी १८ वर्षांखालील युवकांची स्वयंसेवक म्हणून नियुक्ती केली आहे. दिव्यांग मतदारांबरोबरच वयोवृद्ध मतदारांनादेखील हे स्वयंसेवक मदत करणार आहेत.

**रायगड लोकसभा मतदारसंघात दिव्यांग मतदारांचे १०० टक्के मतदान करण्याचा निर्धार केला आहे. यासाठी विधानसभानिहाय दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्थांची मदत घेतली आहे. तालुकानिहाय बैठक घेऊन दिव्यांगांनादेखील मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. मतदारसंघातील दिव्यांग मतदारांचा आढावा यंत्रणांमार्फत घेण्यात आला आहे. दिव्यांग मतदारांना मदतनीस म्हणून १८ वर्षाखालील युवकांची नेमणूक करण्यात आली आहे. दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्थांनी मतदान प्रक्रियेत झोकून काम केले आहे.**
**- साईनाथ पवार, दिव्यांग आयकॉन रायगड**

## शासकीय विश्रामगृहाला टाळे

असून, हे सुरु तरी केव्हा होणार याची विचारणा अधिकारी व पर्यटक करीत आहेत. ऐन निवडणुकीत जिल्ह्याबाहेरील अधिकारी निवडणुकीचे काम करण्यासाठी येत असतात; परंतु विश्रामगृह नसल्याने त्यांना सध्या खासगी लॉजिंगचा आसरा घ्यावा लागत आहे.याबाबत मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपअभियंता रमेश गोरे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अलिबाग येथील श्रीनाथ कन्स्ट्रक्शन यांना काम देण्यात आले आहे. त्यांनी हे काम अद्याप सुरु न केल्याने त्यांना लेखी पत्र पाठवण्यात येणार असून, लवकरात लवकर हे काम सुरु करण्याचे सांगण्यात आले आहे. सदरील विश्रामगृहाचे दुरुस्ती व पेंटिंग तसेच इलेक्ट्रिकचे कामसुद्धा करण्यात येणार आहे. दरम्यान, या विश्रामगृहाचे काम लवकरात लवकर हाती घ्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# कार्याध्यक्षपदी सुवर्णा जाधव यांची नियुक्ती



**। माणगाव । प्रतिनिधी ।**
माणगाव येथील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या विवा कॉलेजच्या कार्याध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे यांच्या हस्ते व उपप्राचार्य योगेश रानभरे, रुपेश जाधव, निलेश पालकर, जय पालकर, कॉलेजचे प्रा. प्रतीक नागरगोजे तसेच कॉलेजचे विद्यार्थी यांच्या उपस्थित देण्यात आले. सुवर्णा जाधव यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तररांतून अभिनंदन होत आहे.



## पाण्याची टाकी, पाईपलाईनचे भूमीपूजन

**। तळा । वार्ताहर ।**
म्हसळा तालुक्यातील घोणसे म्हशाची वाडी येथे पद्मश्री डॉ. अनुराधा पौडवाल यांच्या सूर्योदया फाऊंडेशनच्या अर्थसहाय्याने नैसर्गिक पाण्याची साठवण टाकी व पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. या कामाचे भूमीपूजन म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन चौधरी यांच्या हस्ते पार पडले. या कामासाठी सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाप्रसंगी गावाचे मुंबई अध्यक्ष सचिन खेडेकर, स्थानिक अध्यक्ष रतिश पवार, महिला अध्यक्षा अश्विनी घोले यांसह नवतरुण मित्रमंडळ, रेमाई महिला बचत गट व म्हशाची वाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते दिबांच्या फोटोचे अनावर

**उरण :** उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी आपल्या दालनात प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते दि.बा. पाटील यांच्या फोटोचे अनावर केले आहे. याबाबत गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. समीर वाठारकर यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गंगाराम नारायण शेळके यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

मौजे गोंधळपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं.१६/१, १६/४, १६/७ १६/८, १७/३, १७/४ ह्या मिळकतींवर बांधण्यात आलेल्या नियोजित इंद्रप्रस्थ प्रकल्पातील क्लस्टर-१ मधील इमारत क्रमांक १ मधील रेज्ड दुसऱ्या मजल्यावरील सी-विंग मधील निवासी सदनिका नं.३०२ कारपेट क्षेत्र ४३० चौ. फुट (३९.९६ चौमी) ज्यासी ग्रामपंचायत वेश्वी मालमत्ता क्रमांक ८७९/सी/३०२ ही निवासी सदनिका मिळकत.

सदरहू वर्णन केल्ली निवासी सदनिका मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर निवासी सदनिका मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर निवासी सदनिका मिळकतीत अन्य कुणाचाही महाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर निवासी सदनिका मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०६/०५/२०२४

सही/-
**ॲड. सचिन धिरजलाल मकाणी**
पत्ता गुर्जरवाडी, बाजारपेठ अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं.:९८२२९८२८२५




● रायगड लोकसभा मतदारसंघ महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांची प्रचार सभा शनिवारी (दि.४) नागोठणे येथे पार पडली. यावेळी आमदार जयंत पाटील, विष्णू पाटील, किशोर जैन, राजा ठाकूर, शंकरराव म्हस्कर, सुभान अली शेख आदी मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

# गीतेंच्या विजयात मुस्लीम समाजाचा वाटा

## आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन




। नागोठणे । वार्ताहर ।

लोकसभेची ही निवडणूक आता जनतेने हातात घेतलेली आहे. कुणीही पैसे मागत नाही व कसलीही अपेक्षा करीत नाही. या निवडणुकीत देशातील, जिल्ह्यातील वातावरण बदललेले आहे. मोदींना हटविण्याचे काम या देशातील १३ टक्के मुस्लीम जनता करीत आहे. ही निवडणूक आपण वेगळ्या प्रकारे लढवायची असून, जिंकायची आहे. त्यामुळे या निवडणुकीत अनंत गीतेंना प्रचंड मताधिक्य देऊन दिल्लीला पाठवायचे आहे. त्यामध्ये मुस्लीम समाजाचा मोठा वाटा असेल, असे ठोस प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी नागोठण्यात केले. इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ येथील हुजरा मोहल्ल्यात शनिवारी (दि.४) रात्री संपन्न झालेल्या सभेत ते बोलत होते.

या सभेला आ. जयंत पाटील यांच्यासह शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख विष्णूभाई पाटील, सहसंपर्कप्रमुख किशोर जैन, काँग्रेसचे रायगड लोकसभा समन्वयक राजा ठाकूर, स्टार प्रचारक शेख सुभान आली, शिवसेना जिल्हा प्रवक्त्या मनिषा ठाकूर, सुवर्णा वाळूंज, शेकापचे शंकरराव म्हसकर, महादेव मोहिते, शिवसेना नागोठणे विभाग प्रमुख संजय भोसले, उपविभागप्रमुख संजय महाडिक, युवसेना राज्य विस्तारक सुधीर ढाणे, जिल्हा युवती अधिकारी धनवंती दाभाडे, माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, निलोफर पानसरे, उपसरपंच अकलाख पानसरे, माजी उपसरपंच सुरेश जैन, मोहन नागोठणेकर, शाखा प्रमुख धनंजय जगताप, काँग्रेसचे शहर अध्यक्ष अशपाक पानसरे, शब्बीर पानसरे, सगीर अधिकारी, बिलाल कुरेशी, नजीर पानसरे, शब्बीर अधिकारी, सुहेल पानसरे, इम्रान पानसरे, आसिफ मुल्ला, समीर भिकन, शबाना मुल्ला, शहनाज अधिकारी, कांचन माळी, लियाकत अधिकारी, अजिज पानसरे, सत्तार दफेदार, अबू पानसरे, संजय काकडे, ज्ञानेश्वर साळुंखे, अनिल महाडिक, दानिश अधिकारी, बाबा मुल्ला आदींसह नागोठणे ग्रामपचायत मधील शिवसेनेचे सर्व सदस्य, नागरिक व मोहल्ल्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या सभेत सुवर्णा वाळुंज, मनीषा ठाकूर, निलोफर पानसरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. सभेचे सूत्रसंचालन कीर्तीकुमा कळस यांनी केले.

### नागोठण्यातून मताधिक्य देणार : जैन

उद्धव साहेबांना शब्द दिल्याप्रमाणे नागोठणे ग्रामपंचायतीत एकहाती सत्ता मिळविली. इंडिया आघाडीचा तो पहिला विजय होता. नागोठण्यातील पाया आम्ही विकासाच्या मुद्द्यावर रचला. सुकेळी व भिसे खिंडीमधून नागोठण्याकडे उतरलो की, एक घरही शिल्लक ठेवले नाही एवढे नागोठणे मजबूत केले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये मी तीन हजार मतांनी निवडून आलो होतो. आता गीते साहेबांना नागोठणे विभागात चार ते पाच हजारांचे मताधिक्य देणार असल्याचा विश्वास शिवसेना नेते किशोर जैन यांनी व्यक्त केला.

### भाजपाची जुलमी राजवट घालवणार : ठाकूर

भाजपच्या राजवटीत अन्याय होत असल्यानेच या सभेला मुस्लीम महिला एवढ्या मोठ्या संख्येने आल्या आहेत. कोविड काळात टाळ्या, थाळ्या वाजविण्यास सांगणाऱ्या मोदींनी एअरपोर्ट बंद केले असते तर देशात कोविड पसरला नसता. भ्रष्टाचारी असलेल्यांना हे सोबत घेऊन बसले. भविष्यात यांच्यामुळे देशात लोकशाही जाऊन हुकुमशाही येईल. त्यामुळे भाजपची जुलमी राजवट घालविण्यासाठी इंडिया आघाडीच्या माध्यमातून आपण एकत्र आल्याचे यावेळी राजा ठाकूर यांनी स्पष्ट केले.

# शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणार

## आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन




। गडब । वार्ताहर ।

शेतकऱ्यांचे अस्तित्व टिकले पाहिजे, शेतकऱ्यांच्या बाजूने असणाऱ्यांना मतदान करा, शेतकऱ्यांना विरोध करणाऱ्यांना मतदान करू नका, असे आवाहन आ. जयंत पाटील यांनी गडब येथे केले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनंत गीते यांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहनही आ. जयंत पाटील यांनी केले.

रायगड लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारसभेचे आयोजन गडब येथे करण्यात आले होते. यावेळी आ. जयंत पाटील यांच्यासह लोकसभेचे उमेदवार अनंत गीते, शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख विष्णुभाई पाटील, सहसंपर्क प्रमुख किशोर जैन, समन्वय नरेश गावंड, उपतालुका प्रमुख हिराजी चोगले, विभाग प्रमुख गजानन मोकल, शेतकरी संघर्ष समितीचे के.जी. म्हात्रे, गजानन पेडवी, सुशील कोठेकर, दिगंबर पाटील, लक्ष्मण कोठेकर, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, काँग्रेसचे पेण तालुकाध्यक्ष अशोक मोकल, शेकापचे पी.डी. पाटील, लक्ष्मण गांवड, युवासेनेचे निशांत पाटील, शेतकरी संघर्ष समितीचे कार्यकर्ते व इंडिया आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या परिसरात एमआयीसी मार्फत भूसंपादन होत आहे, त्या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध आहे. येथील शेतकऱ्यांचा विकासाला विरोध नाही; परंतु शेतकऱ्यांना विश्वासात घेतले पाहिजे, दलाली करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे. तुम्ही जो विश्वास दाखवला आहे, त्याला तडा जाऊ देणार नाही. तुम्ही गीतेंना मत देत नाही, तर जयंत पाटलाला मत देताय, आपल्याला शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यायचा आहे, शेतकरी संघर्ष समितीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गावाचा विकास झाला पाहिजे, शेतकरी संघर्ष समितीला राजकारणात आणत नाही; परंतु हा शेतकऱ्यांचा लढा जे शेतकऱ्यांच्या बाजूने आहेत, त्यांना शेतकरी मतदान करतील. तटकरेंनी विश्वासघात केला आहे. अनंत गीते सर्वसामान्य उमेदवार आहेत, ते विजयी होतील, असे आ. जयंत पाटील यांनी यावेळी सांगितले.

यावेळी अनंत गीते यांनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तर, ही निवडणूक भावी पिढीचे आयुष्य घडविणारी आहे. भाजप संविधान बदलायला निघाले आहे, आपल्याला संविधान वाचवयाचे आहे, यासाठी अनंत गीते यांना विजयी करा, असे अवाहन शिवसेनेचे संर्पक प्रमुख विष्णु पाटील यांनी सांगितले. जे शेतकऱ्यांच्या बाजूने आहेत, त्यांच्याबरोबर शेतकरी राहातील, असे शेतकरी संघर्ष समितीचे के. जी. म्हात्रे यांनी यावेळी सांगितले.








# अलिबाग शहरामध्ये इंडिया आघाडीची प्रचार रॅली



। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड लोकसभा मतदार संघाच्या निवडणूकीमधील महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारासाठी अलिबाग शहरामध्ये इंडिया आघाडीच्यावतीने रॅलीचे आयोजन शनिवारी सायंकाळी करण्यात आले. या रॅलीला प्रचंड गर्दी झाली होती. एक वेगळा उत्साह घेऊन कार्यकर्ते या रॅलीत सहभागी झाले होते. अनंत गीतेंना मतदान करा, असे आवाहन या रॅलीच्या माध्यमातून मतदारांना करण्यात आले.

यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, वृषाली ठोसर, प्रदिप नाईक, संजना कीर, अनिल चोपडा, सतिश प्रधान, अशोक प्रधान, संदीप शिवलकर, समीर ठाकूर, कमलेश खरवले शेकाप, शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस आदी इंडिया आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित होते.







अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून रॅलीला सुरुवात करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महावीर चौक, जूनी नगरपरिषद, मारुती नाका, जूनी पोस्टाची गल्ली, पापभाई पठाण चौक, बाजारपेठ ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी ही रॅली काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून आणि मशाल पेटवून रॅलीची सांगता करण्यात आली. या रॅलीत इंडिया आघाडीचे असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते. मशाल या चिन्हासमोरील बटण दाबून महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना मतदान करा, असे आवाहन मतदारांना यावेळी करण्यात आले.

# तटकरेंनी सत्ता भोगण्याचेच काम केले

## पंडित पाटील यांची टीका




। म्हसळा । वार्ताहर ।

गेली कित्येक वर्षे सुनील तटकरे यांनी सत्ता भोगली; परंतु एवढ्या वर्षात त्यांनी किती लोकांना रोजगार दिले याचे उत्तर द्यावे, मग तुम्हाला अनंत गीते यांना बोलण्याचा काय अधिकार? ही लढाई धनशक्ती विरुद्ध श्रमशक्ती अशी आहे, असा घणाघात शेकाप नेते माजी आ. पंडित पाटील यांनी करीत विरोधकांचा समाचार घेतला. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष असणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. आजची सभा होऊ नये म्हणून बरेच जणांनी प्रयत्न केले. परंतु, ही इंडिया आघाडी आहे. या आघाडीच्या नादाला तुम्ही न लागणेच तुमच्यासाठी भल्याचे आहे, असे सांगताना बॅ. अंतुले साहेबांनी लोकशाहीचा बहुमान केला, सर्वांना समान न्याय दिला. परंतु, आत्ताचे सरकार लोकशाहीचा गळा दाबण्याचे काम करीत असून, ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे पंडित पाटील म्हणाले. शनिवारी म्हसळा येथे इंडिया आघाडीची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी माजी मंत्री हुसेन दलवाई, शेकापचे माजी आमदार पंडीत पाटिल, संजय कदम, काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. मुईज शेख, उपजिल्हा प्रमुख नंदू शिर्के, अहंमद पेनकर, संतोष पाटील, तालुका प्रमुख सुरेश कुडेकर, शेकाप श्रीवर्धन तालुका चिटणीस वसंत यादव,सुजित तांदळेकर, अझर धनशे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सुभान अली यांनी नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे, सुनिल तटकरे यांचा खरपूस समाचार घेऊन शिवाजी महाराजांच्या नावाचा वापर करून महाराष्ट्रातील जनतेशी गद्दारी करणाऱ्याना कायमचे गाडून टाकण्याचे आवाहन केले.

माजी मंत्री हुसेन दलवाई यांनी सांगितले की, आमचे सरकार आले तर ज्या-ज्या नेत्यांनी भ्रष्टाचार केला आहे त्या सर्व नेत्यांना प्रथम आत टाकले जाईल. नरेंद्र मोदी आणि अमित शहा कुठे पळून जाणार नाहीत याची दक्षता आम्ही घेऊ. पीएम फंडातील पैसा मोदींनी कुठे गायब केला याची चौकशी निश्चित केली जाईल असे हुसेन दलवाई यांनी सांगितले.



# वेश्वीत दुचाकी रॅली



। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत इंडिया आघाडीच्यावतीने दुचाकीसह मशाल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये ग्रामपंचायत हद्दीतील अनेक कार्यकर्त्यांनी सहभागी होऊन अनंत गीते यांना मतदान करण्याचे आवाहन मतदारांना केले.

रॅलीला सुरुवात वेश्वी येथून करण्यात आली. त्यानंतर गोंधळपाडा, गवळीवाडी, वाडगांवफाटा, नांदपपाडा मार्गे वेश्वी अशी काढण्यात आली. शंभर दुचाकीसमवेत मशाली पेटवून इंडिया आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रॅलीमध्ये सहभाग घेतला. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात कार्यकर्त्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

रायगड लोकसभा मतदार संघाचे इंडिया आघाडीचे तसेच शेतकरी कामगार पक्षाचे पुरस्कृत उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारासाठी प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीला चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल सर्वांचे मनापासून वेश्वीचे माजी सरपंच आभार व्यक्त केले. यावेळी एक नंबरचा बटण दाबून अनंत गीते यांना मतदान करा, आपली निशाणी मशाल अशा घोषणा देत रॅलीची सांगता करण्यात आली.

# लोकसभेनंतरच्या निवडणुका लक्ष्य

## आता उमेदवारांच्या प्रचारात इच्छुकांची गर्दी

**। सुयोग आंग्रे ।**
**। रायगड ।**

**सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे खरे, पण उमेदवारांच्या प्रचारासाठी झटणाऱ्यांमध्ये आगामी काळातील विधानसभा व पुढच्या वर्षी होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदांसाठी इच्छुक असलेले चेहरे दिसत आहेत. लोकसभेनंतर आठ महिन्यांत दोन मोठ्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. यामुळे रायगड आणि मावळ लोकसभा मतदारसंघांमध्ये इच्छुकांची गर्दी प्रचारात उतरली आहे.**

इंडिया आघाडीकडून रायगड लोकसभा मतदारसंघातून माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, महायुतीकडून सुनील तटकरे तर मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीतर्फे श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीकडून संजोग वाघेरे पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आपला नेता निवडून आल्यास निश्चितपणे त्यांच्या राजकीय वरदहस्ताने आपल्यालाही पुढे राजकारणात कोठेतरी संधी मिळेल, अशी अपेक्षा अनेकांना आहे. जवळपास सव्वादोन वर्षांपासून जिल्ह्यातील महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांसह काही नगरपालिका, नगरपरिषदांवर प्रशासकराज आहे. साधारणतः मार्च २०२२ पासून त्याठिकाणी निवडणुका न झाल्याने आता इच्छुकांची संख्या प्रचंड वाढली आहे.

राज्यातील राजकीय समीकरणात मोठी उलथापालथ झाल्याने इच्छुकांना मोठी संधी वाटू लागली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी उमेदवारापेक्षा सुद्धा हे भावी नगरसेवक, सदस्यच प्रचारासाठी पुढे पुढे करीत असल्याची स्थिती आहे. दुसरीकडे लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये विधानसभेची निवडणूक होईल. त्यावेळी पक्षाकडून आपलेच नाव जाहीर होईल, यादृष्टीने वेगवेगळ्या पक्षातील अनेक भावी आमदार देखील प्रचारात मागे नाहीत. पण, त्यांना आताच्या निवडणुकीत दिलेला शब्द पाळला जाणार की पुन्हा एकदा चॉकलेटच ठरणार, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.



### जानेवारी-फेब्रुवारीत निवडणुका

सध्या सुरू असलेली लोकसभेची निवडणूक ४ जूनला मतमोजणी झाल्यानंतर संपेल. त्यानंतर तीन महिन्यानंतर लगेचच विधानसभेची निवडणूक जाहीर होईल. २०१९ ची विधानसभा निवडणूक २१ ऑक्टोबरला झाली होती. त्यामुळे यंदा आपल्या निश्चितपणे आमदारकीची संधी मिळणार म्हणून तर काहीजण उमेदवारांचा मतदारसंघ आपल्याला मिळेल या आशेने जोरदार प्रचार करीत आहेत. दुसरीकडे विधानसभा निवडणूक झाल्यावर अडीच- तीन महिन्यानंतर म्हणजेच जानेवारी- फेब्रुवारी २०२५ मध्ये जिल्हा परिषद, महापालिका, पंचायत समित्यांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी निवडणूक होईल. लोकसभा निवडणुकीनंतर साधारणत: आठ- नऊ महिन्यांत दोन मोठ्या निवडणुका होणार असल्याने इच्छुकांनी आतापासूनच नेत्यांच्या पुढे पुढे करायला सुरवात केली आहे. त्याचे चित्र लोकसभेच्या प्रचारावेळी पाहायला मिळत आहे.

# वृध्द महिलेच्या सोन्याच्या बांगड्या लंपास

**पोलादपूर** : तालुक्यातील महालगूर येथील एका वृध्देच्या हातातील २ सोन्याच्या बांगड्या अज्ञात इसमाने चोरून नेल्याची घटना पोलादपूर एसटी स्थानकामध्ये घडली असून याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.२ मे २०२४ रोजी दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास सुलोचना सिताराम घाडगे यांच्या हातातील दोन वापरत्या तीन तोळ्याच्या बांगड्या त्या एसटीमध्ये चढत असताना अज्ञात इसमाने त्यांच्या वृध्दापकाळाचा गैरफायदा घेऊन हातातून ओढून लंपास केल्या. तीन तोळे वजनाच्या फुलांची डिझाईन असलेल्या या जुन्या वापरत्या बांगडयांची किंमत पोलीस तक्रारीत ४५ हजार रूपये नोंद करण्यात आली असून सध्याच्या बाजारभावानुसार २.७५ लाख रूपये किंमत होत आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार बामणे हे पोलीस निरिक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे माणगावतर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक जिग्नेश हसमुखराय शेठ यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविल्या आहेत सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४३ | २ | ०-४०-०० पैकी अविभक्त हिश्श्याचे खरेदी करणेचे क्षेत्र ०-२०-०० | ७-०० |
| ५५ | १ | ०-४१-७० पैकी अविभक्त हिश्श्याचे खरेदी करणेचे क्षेत्र ०-२०-८५ | २-१७ |

तरी वरील मिळकतीच्याबाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपटटा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०६/०५/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

# वृद्ध इसमाचा आढळला मृतदेह

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल परिसरात एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. शहराजवळील डोंबाळा कॉलेज रोडवर जाणाऱ्या रस्त्याजवळ एका ६० ते ६५ वर्षीय वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे फोन नं ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

# ‘वसुंधरा’साठी तांबाटी ग्रामपंचायतीचे अथक प्रयत्न

**। रसायनी । वार्ताहर ।**

माझी वसुंधरा हा अभिनव उपक्रम राज्यातील ग्रामपंचायत यांच्या मार्फत राबविण्याचा संकल्प प्रशासनाने केला आहे. खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनीही त्यासाठी मेहनत घेतल्याचे प्रत्यक्ष पाहणी करता दिसत आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरण विभागामार्फत नागरी आणि ग्रामीण क्षेत्रासाठी राबविण्यात येणार हा उपक्रम आहे.




यामध्ये स्थानिक नैसर्गिक परिसंस्थाचे जतन व संरक्षण करण्यासाठीच्या विविध उपायांची अंमलबजावणी करणे आणि वातावरणीय बदलांच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या पर्यावरण पूरक कृती उपक्रमावर नागरिकांना प्रोत्साहित करुन त्यांचा सहभाग समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या अभियानाची रचना कार्बन सिक्रिटेशन हरित करुन उत्सर्जन कमी करणे आणि नागरिकांमध्ये शाश्वत जीवनशैलीचा प्रसार आणि प्रचार करणे या वातावरणीय बदलाच्या तीन महत्त्वाच्या बाबीवर लक्ष केंद्रित करण्याचा संकल्प सोडला आहे. ग्रुप ग्रामपंचायत तांबटी यांच्या मार्फत माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत अग्नी, वायू, जल, भूमी व आकाश या पाचवर काम सुरु केले आह.

यामध्ये वृक्ष लागवड, घनकचरा व्यवस्थापन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, कापडी पिशव्यांचा वापर, पाणी आडवा पाणी जिरवा, प्रदूषणकारी फटाके यावर बंदी, प्लास्टिक वापर न करणे, सोलरचा वापर, ठिबक सिंचन, शेततळे, तलावातील गाळ काढणे तसेच माझी वसुंधरा अंतर्गत प्लास्टिक बंदी, शाडूच्या मूर्तीचा वापर करणे, गणपती पुजेच्या निर्माल्यापासून कंपोस्ट तयार करणे, तसेच इतर माझी वसुंधरा उपक्रमाचे जनजागृतीचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

यामध्ये ग्रुप ग्रामपंचायत तांबाटीचे सरपंच अविनाश शंकर आमले व ग्रामसेवक प्रशांत पांडुरंग कदम तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी भाग घेऊन कामकाज सुरू केले आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत तांबाटी हद्दीतील शिक्षक, विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, महिला, महिला बचत गट, ग्रामस्थ तसेच तरुण-तरुणी यांचेही सहकार्य लाभले.

# आंबिवलीत अखंड हरिनाम सप्ताह

**। रसायनी । वार्ताहर ।**

आळी आंबिवली येथील ग्रामदेवता बळाल्लेश्वर मंदिरात एकादशी व व्दादशीनिमित्त काल्याच्या किर्तनाने हरिनाम उत्सवाची सांगता करण्यात आली.यानिमित्त दोन दिवस काकड आरती, ज्ञानेश्वरी अध्याय पारायण, हरिपाठ, हरिकिर्तन, जागर, भजन, सकाळी प्रतिमा पूजन, कळश व तुळसपूजन, ध्वजपूजन ,दिपोत्सव आदी कार्यक्रम पार पडले.शनिवारी सायंकाळी आळी आंबिवली श्री बळाल्लेश्वर मंदिर ते मोहोपाडा शिवाजी चौक पुन्हा मोहोपाडा गावातून आळी आंबिवली अशी काढण्यात आली.

**नागाव, ता. अलिबाग येथे नारळ फोफळीच्या वाडीत प्लॉट उपलब्ध आहेत.**

● शांत परिसर, ●बंगलो कॉटेजसाठी उत्तम. ● प्लॉटमध्ये आंबा, नारळ, सुपारीची झाडे. ●एकट्याच्या मालकीची (singal owner )
● टायटल क्लिअर ●अलिबाग- रेवदंडा रस्त्यालगत
● समुद्रापासुन जवळ ● नागाव बिच १ कि.मी. अंतरावर
●अलिबाग शहर ८ कि.मी. अंतरावर ● किंमत- १२.५० लाख प्रती गुंठा.

संपर्क : ॲड. पराग गुरव
८४४६८८०००९
श्री. मोहित प्रधान
७७४४०८३५७८

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ चेंबूर पूर्व मुंबई येथे स्टेशन जवळ
८६६ स्क्वेअर फूट कारपेट बालकनी सह १ कारपार्किंग नवीन टॉवर ॲमेनीटी सह ताबा ३ महिन्यात मिळणार १० वा मजला नवीन कॉम्लेक्स मध्ये फ्लॅट विकणे आहे.
मोबाईल : ९८२१२११४८०/९५७७२१६४९९

■ अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत.
Receptions-Housekeeping-waiter-Helper-Cook etc. संपर्क- 8208459424/9323152990
Email. csskshrisnkar@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# निवडणूक कालावधीत मद्यविक्री करण्यास मनाई

## जिल्हाधिकारी किशन जावळे

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ ही खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक कालावधीत मद्यविक्री करण्यास मनाई करून कोरडा दिवस जाहिर करण्यात आला आहे.

मतदान समाप्तीकरीता निर्धारित वेळेच्या आधी ४८ तास ५ मे रोजी सायंकाळी १७.०० वाजल्यापासून, मतदानाच्या पुर्वीचा ६ मे रोजी संपुर्ण दिवस आणि मतदानाचा दिवस म्हणजे ७ मे रोजी संपूर्ण दिवस प्रत्यक्षात मतदान संपेपर्यंत रायगड लोकसभा मतदारसंघातील पेण, अलिबाग, श्रीवर्धन व महाड या विधानसभा मतदार संघात मद्य विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

लोकसभा निवडणुका २०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. सदर कार्यक्रम ानुसार रायगड मतदार संघात ७ मे रोजी मतदान होणार आहे. तसेच मावळ मतदार संघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार सर्वत्र मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार आहे. मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी होवून निकाल जाहीर होईपर्यंत या कालावधीत मद्यविक्रीस मनाई करून कोरडा दिवस ठेवणेबाबत आदेश जारी केले आहेत.

मावळ लोकसभा मतदार संघामध्ये मतदान समाप्तीकरीता निर्धारित वेळेच्या आधी ४८ तास ११ मे रोजी सायंकाळी १७.०० वाजल्यापासून, मतदानाच्या पूर्वीचा १२ मे रोजी संपूर्ण दिवस आणि मतदानाचा दिवस १३ मे रोजी संपूर्ण दिवस प्रत्यक्षात मतदान संपेपर्यंत मावळ लोकसभा मतदार संघात मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवण्यात येईल.

# रिक्षाची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल परिसरातून एका रिक्षाची चोरी झाल्याची घटना घडली आहे.शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटी परिसरात बदेनवाज शेख यांनी त्यांची ५० हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची रिक्षा (क्रमांक ४६ ०४१६) पार्किंगमधृये उभी ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर रिक्षा चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# धानेश्वर मंदिरात वर्धापन दिन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील धानकान्हे येथील गावाचे श्रद्धास्थान असलेल्या धानेश्वर मंदिराचा प्रथम वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

यावेळी देवतांना अभिषेक व पूजाविधी, श्री.सत्यनारायणाची महापूजा, हरिपाठ व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.



यावेळी सखाराम कचरे, धोंडू कचरे, अर्जुनराव कचरे, पांडुरंग कचरे, पांडुरंग गोसावी, पोलीस पाटील देवजी कचरे, चंदू गोसावी, महादेव कचरे, जनार्दन गोसावी, अप्पा शेलार, चंद्रकांत जाधव, बबन जाधव, सुभाष जाधव, राजेश कचरे, दिलीप कचरे, सुदाम कचरे, सहदेव बाईत तसेच सर्व महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# रायगड लोकसभा मतदारसंघात २७५३ मतदाराचे गृह मतदानाचा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व प्रमाणपत्र असलेल्या नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी घरबसल्या मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण २७५३ मतदारांनी गृह मतदानाचा हक्क बजावला, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

३० एप्रिलपासून मतदारसंघातील ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या २३२४ ज्येष्ठ नागरिकांनी, ३८६ दिव्यांग मतदार यांनी प्रथमच घरबसल्या तसेच ४३ अत्यावश्यक सेवेतील मतदार यांनी टपाली मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. गोपनीय पद्धतीने मतदान करण्याची सुविधा पुरविण्यात येऊन संबधित विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त करण्यात आलेल्या क्षेत्रीय अधिकारी, मतदान अधिकारी तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी गृह मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. यावेळी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी आभार मानले.

# दुचाकीची चोरी

**पनवेल** : पनवेल शहराजवळील गव्हाण फाटा ब्रिजच्या बाजूला उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.भूषण वाघ यांनी त्यांची ६० हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची मोटार सायकल उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी ती चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# कानसळ सलग दुसऱ्यांदा ठरले स्वप्नातील गाव

**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

**रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशन संस्थेच्या वतीने दक्षिण रायगड मधील सात तालुक्यांमध्ये गाव विकासाची कामे लोक सहभागामधून मोठ्या प्रमाणात केली जात आहेत. याच कामाला गती देण्यासाठी आणि लोकांमध्ये ऊर्जा निर्माण करण्यासाठी स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे आणि संचालक प्रदीप साठे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वप्नातील गाव या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये कानसळ हे गाव सलग दुसऱ्या वर्षी स्वप्नातील गाव म्हणून नुकतेच घोषित करण्यात आले.**

कानसळ गाव विकास समिती, युवा मंडळ, महिला आणि ग्रामस्थ यांनी एकत्रित येऊन गाव विकास व आदर्श गाव करण्याच्या हेतूने २०१९ पासून प्रयत्न सुरू केले. स्वदेस फाउंडेशन च्या सहकार्याने गावकऱ्यांनी स्वच्छ, सुंदर, स्वास्थ, साक्षर आणि समृद्ध या मुख्य घटकांचा विचार करून गाव विकास आराखडा बनवला आणि त्यानुसार कामाला सुरुवात केली. गाव सुंदर आणि आकर्षक दिसण्यासाठी गावातील महिला व युवक यांनी हिरीरीने मोठा सहभाग घेतला व दुसऱ्यांदा आपले गाव स्वप्नातील गाव बनविले.



गावाची पूर्वीची परिस्थिती खूप दयनीय होती, परंतु स्वदेस फाउंडेशन मार्फत झालेली पाणी योजना, शौचालय, शाळेसाठी शौचालय, शाळेसाठी सौर लाईट, ग्रंथालय, सौर पथदिवे, मुलांसाठी संगणक, प्राथमिक उपचार पेटी, तसेच वेगवेगळ्या उत्पन्न वाढीच्या योजना राबविण्यात आल्या. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेतात फळबाग लागवड, ठिबक सिंचनच्या माध्यमातून चारा लागवड केली आहे व कुक्कुटपालनासारखे व्यवसाय सुरू केले आहेत. गावामध्ये १०० टक्के लोकांचे बँक खाते आहे, घर पक्के व रंगीत आहे, आरोग्य विमा, घरगुती गॅस, घरे घरगुती सौर ऊर्जा वापरतात, लोकांचे आधार कार्ड, लोकांचे जातीचे दाखले आणि प्रत्येक कुटुंबाची आर्थिक उत्पन्न वाढ होण्याच्या दिशेने वाटचाल, मोतीबिंदू मुक्त गाव आहे, ० ते १६ वयोगटातील १००% मुले शाळेत जातात. स्वप्नातील गाव घडविण्यासाठी गाव विकास समितीचे सर्व सदस्य, बचत गटांमधील महिला, युवक व ग्रामस्थ आणि स्वदेस फाऊंडेशन टीम यांनी अहोरात्र मेहनत घेऊन हे गाव स्वप्नातील गाव प्रमाणित केले.

या कार्यक्रमासाठी स्वदेस फाऊंडेशनचे संचालक प्रदीप साठे, वरिष्ठ व्यवस्थापक शिवदास वायाळ, वरिष्ठ समन्वयक सोनाली पवार, किरण शिंदे उपस्थित होते. तसेच गाव विकास समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष, सर्व समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा या स्वच्छ, सुंदर, स्वास्थ, साक्षर आणि समृद्ध स्वप्नातील कानसळ गावाला आपण एकदा भेट द्यावीच, असे आवाहन सुधागड तालुक्यातील कानसळ गावातील ग्रामस्थ आणि स्वदेस फाऊंडेशन यांनी केले आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मी अलंकार रामकृष्ण म्हात्रे रा. तलावआळी अदितवार बुवा उद्यानाजवळ सेक्टर १९ कोपरखैरणे नविमुंबई, कोपरखैरणे स.ओ.ठाणे महाराष्ट्र ४००७०९ येथील रहिवासी असून दिनेश छगनलाल परमार यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कुरमुरली | दिनेश छगनलाल परमार | ६७/१ | ०.२५.१० | ३.२८ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेल व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. ०६/०५/२०२४

**अलंकार रामकृष्ण म्हात्रे,**
रा. तलावआळी अदितवार बुवा उद्यानाजवळ,
सेक्टर १९ कोपरखैरणे नवीमुंबई,
कोपरखैरणे स.ओ.ठाणे महाराष्ट्र ४००७०९,
मो. ९७६८५२८८८९.




● (छायाचित्र : समीर मालोदे)

## तुडुंब गर्दी, मोदीविरोधी घोषणाबाजी

# रायगडकरांचा निर्धार खास, मशाल पेटणार हमखास









## दिग्गजांसह हजारो कार्यकर्त्यांची हजेरी

रायगड लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारासाठी अलिबागमधील समुद्रकिनाऱ्यावरील जेएसएम मैदानात जाहीर सभा रविवारी (दि.०५) आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे, शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी मंत्री नसीम खान, काँग्रेस नेते हुसेन दलवाई, माजी आ. पंडित पाटील, आ. संजय पोतनीस, महाविकास आघाडीचे उमेदवार माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड. प्रविण ठाकूर, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, नृपाल पाटील, शिवसेनेचे नेते बबन पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, काँग्रेसच्या जिल्हा महिला अध्यक्षा ॲड. श्रद्धा ठाकूर, काँग्रेसचे जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक,



रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक, शेकापचे युवा नेते सवाई पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, उल्का महाजन, मिलिंद नार्वेकर, सुभानअली खान, इम्तीयाज पालकर, रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील, मुश्ताक घट्टे, प्रशांत मिसाळ, पिंट्या ठाकूर, काका ठाकूर, सुभाष महाडिक, सुनील थळे, शंकर गुरव आदी शेकापसह इंडिया आघाडीचे पदाधिकारी व हजारो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काही जण हातात लाल झेंडा, काहीजण मशाल घेऊन इंडिया आघाडीचा विजय असो, अबकी बार मोदी हद्दपार अशा घोषणा देत असल्याचे दिसून आले. एक वेगळा उत्साह यावेळी कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला.



● मुख्यमंत्री असताना बंजारा समाजाला निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल समाजाच्यावतीने शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांचा सन्मान करण्यात आला.



● माजी मुख्यमंत्री शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे, शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी अलिबाग येथे काँग्रेसचे माजी आमदार स्व. मधुशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

## गीतेंना विजयी करा : नसीम खान

ही निवडणूक देशाच्या स्वातंत्र्यासाठी, लोकशाही, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले संविधान वाचविण्यासाठी असणार आहे. देशात सध्या राजकारण वेगळ्या पद्धतीने सुरु आहे. खोटे बोलून, वेगवेगळी आमिषे दाखवून गोरगरीबांसह जनतेला मूर्ख बनविण्याचे काम केले जात आहे.



२०१४मध्ये सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांच्या मालाचे भाव दुप्पट करणारे होते. नोकरी देणार होते; पण ही सर्व गॅरंटी खोटी ठरली आहे. शेतकऱ्यांसह तरुणांचे प्रश्न आजही प्रलंबित आहेत. मुंबईमध्ये कोकणासह वेगवेगळ्या जिल्ह्यातील नागरिक नोकरी, व्यवसायासाठी येतो. परंतु त्यांच्या घशातील घास काढण्याचा डाव भाजपने सुरु केला आहे. मुंबईतील अनेक प्रकल्प गुजरातला पाठविण्यास सुरुवात झाली आहे. आर्थिक राजधानी लुटण्याचा घाट या मोदींनी घातला आहे. बॅ. अंतुलेनी रायगडचा विकास साधला. तटकरेंना राजकीय आश्रय दिला. मात्र, त्याच तटकरेंनी अंतुलेंसोबत गद्दारी केली. त्यांना धडा शिकविण्याची वेळ आली आहे. हातात मशाल घेऊन अनंत गीतेंना निवडून द्या, असे आवाहन माजी मंत्री नसीम खान यांनी केले.



## कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष

महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ अलिबाग शहरामध्ये रविवारी प्रचार सभा आयोजित केली होती. या सभेला येण्यास कार्यकर्त्यांची दुपारी बारा वाजल्यापासून सुरुवात झाली. काहीजण हातात मशाल, काहीजण खांद्यावर शेकापचे, काँग्रेस, राष्ट्रवादीचे झेंडे घेऊन चालत येत होते. इंडिया आघाडीचा विजय असो, अनंत गीते यांनाच निवडून द्या अशा घोषणा देत होते. एक वेगळा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला. बोलता बोलता सभागृह पाच हजारांहून अधिक कार्यकर्त्यांनी भरून गेला. आघाडीतील प्रमुख नेत्यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केले. उद्धव ठाकरे यांच्यासह शेकापचे नेते आ. जयंत पाटील यांचे आगमन होताच कार्यकर्त्यांनी घोषणांच्या जयघोषात त्यांचे स्वागत केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून उद्धव ठाकरे यांनी अभिवादन केले. शिवसेना नेते उद्धव ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहताच कार्यकर्त्यांनी जल्लोषात घोषणा दिल्या. त्यांनी भाषणाला सुरुवात केल्यावर संपूर्ण सभागृह शांत झाले. ठाकरे यांचे भाषण प्रत्येक कार्यकर्ता मन देऊन ऐकत होता. त्यांच्या भाषणावर टाळ्यांचा व घोषणांचा पाऊस पडत असल्याचे दिसून आले. भाषण झाल्यावर राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)